# पुणे महानगरपालिका

## सन २०१९–२०

## <u>महापालिका आयुक्त यांचे निवेदन</u>

**स्थायी समितीचे माननीय अध्यक्ष व सभासद,**

माझे पुणे महानगरपालिका प्रशासकीय कारकिर्दितील पहिलेअंदाजपत्रक सादर करताना मला आनंद होत आहे. राज्यातील व देशातील एक अतिशय अग्रगण्य शहर म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर शहराचा नांवलौकीक आहे. विद्येचे माहेरघर या उपाधी बरोबरच उद्योगाचे शहर, सॉफ्टवेअर व आऊटसोर्सिंग निर्यातीचे शहर, व्यावसायिक व बेरोजगारांना संधी देणारे शहर अशीही शहराची ख्याती आहे. देशविदेशातील प्रत्येक घडणाऱ्या घडामोडी व बदलाबाबत अतिशय जागृत असे हे शहर आहे.पुणे शहर हेMost Livable Cityम्हणून ओळखले जात असल्याने अन्य राज्यातील लोकांनाही या शहराचे आकर्षण आहे.  त्यामुळे नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करताना शहरातील पायाभूत सोयीसुविधा व सर्वसमावेशक विकासाची गतीही साधावी लागत असते. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसा, कला, क्रीडा तसेच इतर सर्व बाबींचा विचार करता देशातील अनेक शहरांमध्ये पुणे शहराचे वरचे स्थान आहे. कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीमध्ये देशातील अग्रेसर असलेल्या बेंगलूरू, हैद्राबाद, चैन्नई शहराबरोबर स्पर्धा करणारे पुणे शहर आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या महत्वकांक्षी योजनांची अंमलबजावणी करताना त्यास अनुसरुन माहिती व तंत्रज्ञान, ई–गर्व्हनन्सचा वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी जास्तीत जास्त लोकांना त्या दृष्टीने साक्षर करणे ही काळाची गरज आहे.  वाढत्या शहरीकरणामुळे शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत असून, पायाभूत सुविधांचा सर्वसमावेशक विकास होण्याची आवश्यकता आहे. पुणे महानगरपालिका सर्व सेवांचा सर्वसमावेशक वापर करुन प्रशासकीय यंत्रणा गतीमान, कार्यक्षम व पारदर्शी करुन लोकाभिमुख सेवासुविधा प्रदान करणे हे प्रमुख उद्दिष्ट साध्य करीत आहे.

पुणे शहराची देशपातळीवर स्मार्ट सिटी म्हणून ओळख झाल्याने शहरात महत्वाचे प्रकल्प म्हणून मुख्यत: सुनियोजित व समान पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण करणे(२४X७)पाणी पुरवठा प्रकल्प, महामेट्रो ३१.२५४ किमी व पीएमआरडीए पुणे मेट्रो २३ किमीची मार्गिका, बी.आर.टी. प्रकल्प, शाश्वत वाहतूक व्यवस्था, स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०१९ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, कचऱ्यावर प्रक्रिया करणे व कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करणे,प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्प राबविणे, High Capacity Mass Transit Route (HCMTR)प्रकल्प, राष्ट्रीय नदी संवर्धन अंतर्गत जायका प्रकल्प, नदी सुधारणा प्रकल्प,Storm Water Drainageप्रकल्प,Integrated Smart Steet Lightingप्रकल्प,Smart City Command Control Centre, Adaptive Traffic Control System,पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.करिता बसडेपो व टर्मिनल विकसीत करणे,e-buses, A/C CNG Buses विकत घेणे, Public Bycycle Sharingयोजना राबविणे तसेच इतरही आय.टी. अंतर्गत विविध योजना प्रगतीपथावर आहेत.

## सन २०१८-१९ मध्ये पुणे महानगरपालिकेस मिळालेली ॲवॉर्डस् -

- **इंडिया स्मार्ट सिटी ॲवॉर्ड** -Ministry of Housing and Urban Affair, भारत सरकार यांचेमार्फत भारत स्मार्ट शहर पुरस्कार २०१८ अंतर्गत लखनौ येथे २७ जुलै, २०१८ रोजी तिसरा वर्धापन दिन साजरा करण्यात आला होता. त्यामध्ये लाईट हाऊस प्रोजेक्ट, पब्लिक बायसिकल शेअरिंग आणि प्लेस मेकिंग प्रोजेक्ट आणि भारतातील सर्वात मोठे महापालिका बाँडसाठी ॲवॉर्ड पुणे महानगरपालिकेला प्राप्त झाला आहे.

- **राहण्यायोग्य सर्वोत्तम शहर** -(Ease of Living Index)सन्मान - भारत सरकारच्याMinistry of Housing and Urban Affairs,(गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने)''राहण्यायोग्य सर्वोत्तम शहर'' अहवाल बनविणे सुरु केले. त्यामध्ये ओळखल्या जाणाऱ्या स्मार्ट सिटीसह १११ भारतीय शहरांचे मुल्यांकन केले आहे. त्यामध्ये ७८ संकेतांमधील १०० पॉईंट स्केलवर १ दशलक्षापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या संस्था आणि प्रशासन, सामाजिक पायाभुत सुविधा (शिक्षण/आरोग्य) आर्थिक घटक आणि भौतिक संरचना या ४ प्राथमिक स्तरांसाठी आयोजित प्रतियोगितेमध्ये राहण्यायोग्य सर्वोत्तम शहर म्हणून पुण्याने प्रथम क्रमांक पटकविला आहे.

- **हुडको ॲवॉर्ड** - पुणे महानगरपालिकेला पीपीपी अंतर्गत पुणे स्ट्रीट लाइटनिंग प्रोजेक्ट साठी हुडको बेस्ट प्रॅक्टिस ॲवॉर्ड२०१७-१८ प्राप्त झाला आहे आणि पुणे स्ट्रीट प्रोग्रॅम अंतर्गत जंगली महाराज रोडचे नुतनीकरणासाठी प्रशंसा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

- **जनग्रह ॲवॉर्ड** - जनग्रह संस्थेव्दारे(Centre for Citizenship and Democracy)व्दाराAnnual Survey of India's City Systems (ASICS)अहवालाचे ५ व्या आवृत्तीचे प्रकाशन केले आहे. शहरी भागात प्रशासनात गुणवत्ता ठरविणारा हा अभ्यास २०१७ च्या अंकात भारतातील २० राज्यांमध्ये २३ प्रमुख शहरात ८९ प्रश्नांच्या आधारे पुणे शहराचा समावेश त्यामध्ये झालेला आहे. पुण्याने पहिल्यांदाच १० पैकी ५.१ गुणसंख्या मिळविला असून अन्य ४ शहरांमध्ये कोलकत्ता, तिरुअनंतपुरम्, भुवनेश्वर व सुरत यांचा समावेश आहे.

- **स्कॉच ॲवॉर्ड** - पुणे महानगरपालिकेला १६ प्रकल्पांसाठी डिजिटल, आर्थिक, सामाजिक समावेशन, शहरी स्वच्छता, सर्वोत्तम शासन, समावेशक विकास, तंत्रज्ञानातील उत्कृष्ठता आणि अनुप्रयोग, शिक्षा, नागरिक सेवा वितरण या क्षेत्रातील सर्वोकृष्ठ प्रयत्नांसाठी स्कॉच ॲवॉर्ड ऑफ मेरिट प्राप्त झाला आहे.

  पुणे महानगरपालिकेस सन २०१८-१९ मध्ये शहर अभियंता कार्यालयाकडील ट्रस्ट ॲण्ड व्हेरिफाय ॲप्रोच व प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पास असे २ सहभाग प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहेत.

- **Climate Change and Clean Air Award 2018 चा प्रतिष्ठेचा पुरस्कार** - सॅन फ्रान्सिस्को येथे आयोजित समारंभात वायूप्रदुषण व कचरा व्यवस्थापन या क्षेत्रात पुणे महानगरपालिकेने उल्लेखनीय कामे केल्याबद्दल United Nation Environment Programme या अमेरिकन संस्थेकडून पुरस्कार प्राप्त झाला आहे.

## मागील चार वर्षाच्या महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा

| जमा बाजू | डिसेंबर २०१५ अखेर | डिसेंबर २०१६ अखेर | डिसेंबर २०१७ अखेर | डिसेंबर २०१८ अखेर |
|---|---|---|---|---|
| स्थानिक संस्था कर | ११३४.८३ | १०५१.७४ | ६३५.६६ | ७३.४३ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | ० | ० | ८२३.८० | ११७९.५४ |
| मिळकतकर | ५६९.७८ | ८९८.६० | ६०७.४७ | ७५०.४१ |
| पाणीपट्टी | १३९.७२ | ३५.४९ | १४९.५६ | १९७.४३ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ५७५.०८ | ४०२.०५ | ३२९.१२ | ५५९.८७ |
| इतर जमा | ४८०.२३ | २१७.८७ | २९८.३६ | १९४.४७ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ० | ० | ३९.९० | ०.३० |
| शासकीय अनुदान | ३३.४४ | १२.४१ | ७९.३९ | ९९.०२ |
| कर्जरोखे | ० | ० | २००.०० | – |
| प्रधानमंत्री आवास योजना | – | – | – | ०.०३ |
| **एकुण रक्कम रूपये** | **२९३३.०८** | **२६१८.७४** | **३१६३.२६** | **३०५४.५०** |

| खर्च बाजू | डिसेंबर २०१५ अखेर | डिसेंबर २०१६ अखेर | डिसेंबर २०१७ अखेर | डिसेंबर २०१८ अखेर |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | ८०२.०३ | ७४३.२२ | ११६३.२७ | १०८१.०५ |
| प्राथमिक शिक्षण | ० | १०७.६४ | ० | ० |
| वीजखर्च व दुरूस्ती | ८०.४६ | १११.०६ | १४३.५१ | १४९.८६ |
| पाणीखर्च | १२.०९ | ७.५७ | १३.९८ | ५६.९४ |
| कर्जपरत फेड, व्याज व घसारा | ३९.८४ | ३५.५१ | १२.७१ | २१.०६ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | ५३.६३ | ६९.७० | ६०.३५ | ७४.४२ |
| देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | २९५.२६ | २८७.१३ | ३०९.३५ | ३७६.६५ |
| वॉर्डस्तरीय कामे | २.२२ | ४.४२ | १.३३ | ४.४२ |
| क्षेत्रीय कार्यालयाने करावयाचे कामे (नॉन प्लॅन) | ६.११ | १८.४३ | ०.४० | ५.८६ |
| भांडवली व विकासाची कामे | ५२९.७७ | ४९८.३५ | ५३२.२३ | ४३५.०१ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ९१.५५ | ५१.८४ | ६५.०३ | ३२.९१ |
| **एकुण रक्कम रूपये** | **१९१२.९६** | **१९३४.८७** | **२३०२.१६** | **२२३८.१८** |

# विकास योजना प्रगती आढावा:-

## (१) <u>पाणी पुरवठा(भांडवली तरतूद र. रु.५१३.८३ कोटी + महसूली तरतूद र.रु.३७४.४७कोटी=र.रु.८८८.३० कोटी)</u>

### सन २०१८-१९चा दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

**महत्वाच्या पुर्णत्वास /सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण योजना /प्रकल्प**

- पुणे शहरास २४X७पाणीपुरवठा करण्यासाठी माहे जानेवारी २०१८ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. र.रू.२३०७ कोटीच्या योजनेचे ६ पॅकेज करण्यात आले होते. सदर योजनेमध्ये अंदाजे १८०० कि.मी.लांबीचे विविध व्यासाच्या जलवाहिन्या व सुमारे ३,१५,००० AMRपध्दतीचे मीटर बसविण्याचीकामे करण्यात येणाार असून, ६ पॅकेज पैकी ५ पॅकेजची कामे Larsen & Tubroव ०१ पॅकेजचे काम Jain Irrigation Systemयांना देण्यात आले आहे. सन २०१९-२०२० मध्ये सर्व व्यापारी नळजोडावर मीटर बसविण्यात येणार आहेत. यापुर्वी संपुर्ण शहरामध्ये ८१ साठवण टाक्या बांधण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. त्यापैकी सध्या ६० साठवण टाक्या बांधण्याचे काम सुरू असून त्यापैकी २५ साठवण टाक्या माहे मार्च २०१९ पर्यंत पूर्ण होणार आहेत.
- पुणे शहरासाठी १००% बंद नळातुन पाणी उचलण्याच्या दोन टप्प्या मधील पर्वती जलशुध्दीकरण केंद्र ते लष्कर जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत २२०० मि.मि. व्यासाची दाबनलिका टाकण्याचे काम माहे डिसेंबर २०१८ मध्ये पूर्ण करून कार्यान्वित करण्यात आले आहे.
- पर्वती येथील ५०० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र माहे एप्रिल २०१८ मध्ये पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आले आहे.

### सन २०१९-२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- पुणे शहराच्या पूर्व भागात असलेल्या वडगांवशेरी, खराडी, चंदननगर इत्यादी भागासाठी भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याचे काम सुरू आहे.त्याअनुषंगाने सर्व कामे चालू असून सदरची योजना दिनांक ३१.१०.२०१९ पर्यंत पूर्ण करून कार्यान्वित करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहेत.
- पुणे शहरासाठी २४X७पाणीपुरवठा करणेकामी सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामध्ये र.रू. ४५२कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये र.रू. २०० कोटी कर्ज रोख्यांच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे.
- **राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी प्रदुषण नियंत्रण करणे (जायका प्रकल्प)**

### सन २०१८-२०१९ (तरतूद र.रु.७० कोटी)

- सन २०२७ पर्यंतच्या लोकसंख्या वाढीनुसार निर्माण होणारे संपूर्ण मैलापाणी शुध्दीकरण करणेसाठी राष्ट्रीय नदी संवर्धन संचलनालय, नवी दिल्ली यांची जपान सरकारच्या (जायका) अर्थसहाय्याने करावयाच्या र.रु.९९०.२६ कोटीच्या योजनेस दि.१४.०१.२०१६ रोजी मे. केंद्र सरकारमार्फत मंजुरी मिळालेली आहे.
- सदरची योजना राबविण्याकरिता योजनेच्या ८५% रक्कम केंद्र शासनाकडून अनुदान स्वरुपात पुणे मनपाला प्राप्त होणार असून, उर्वरीत १५% रक्कम पुणे मनपाने उभारणे अपेक्षित आहे. सदरची योजना सहा वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्याचा पुणे मनपाचा मानस आहे.

- सदर योजनेमध्ये प्रामुख्याने ११ ठिकाणी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे उभारणे, सुमारे ११३ किमी लांबीच्या मलवाहिन्या विकसीत करणे, जीआयएस/एमआयएस, स्काडा यंत्रणा उभारणे, कम्युनिटी टॉयलेट ब्लॉक उभारणे इ. अशा एकुण १३ पॅकेजेसच्या कामांचा समावेश आहे.
- सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत र.रु. ३५.८१ कोटी इतका खर्च झालेला आहे.
- पुणे शहरामध्ये पाण्याचे काही नैसर्गिक स्त्रोत आहेत. उदा. बावधन येथील झरा, वृध्देश्वर-सिध्देश्वर घाटाजवळील झरा इत्यादी सद्यस्थितीमध्ये या स्त्रोतांचा वापर होत नाही. सदर स्त्रोतांचा विकास करून सदरचे पाणी पिण्या व्यतिरिक्त उद्यान, बाग, बांधकाम इत्यादी वापरासाठी उपयोगात आणणे शक्य आहे. सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामध्ये र.रू. १ कोटीची तरतूद करण्यात आली असून शहरातील नैसर्गिक स्त्रोतांचा जास्तीत जास्त वापर करण्यास भर देणार आहे.

**सन २०१९-२०२० (तरतूद र.रु.८० कोटी)**

- सदर प्रकल्पामधील ६ मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे उभारण्याचा समावेश असलेल्या पॅकेज क्र. ४,५,६ व ८ (एकुण क्षमता २७७ एमएलडी)आणि मुख्य मलवाहिन्या (७०किमी लांबी) विकसीत करण्याच्या पॅकेज क्र. २ व ३ मधील कामे सुरू करण्यात येणार असून सदर कामे आगामी ३ वर्षात पूर्ण करण्यात येणार आहेत.
- उर्वरीत पॅकेजेस मधील कामांची निविदा प्रक्रिया करण्यात येऊन कामे सुरू करण्यात येणार असून सन २०२२ अखेर कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

## (२) मलनि:सारण(भांडवली तरतूद र. रु.१९९.५५ कोटी + महसूली तरतूद र.रु. १४२.०१ कोटी =३४१.५६ कोटी)

**सन २०१८-१९**

**मलवाहिनी**

- पुणे महानगरपालिका क्षेत्रातील नदी व नाल्यामधून उघड्यावर वाहणारे मैलापाणी नजीकच्या मैलापाणी शुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहचविण्याबाबत मे.राष्ट्रीय हरीत लवाद यांनी दावा क्र.३७/२०१६ व ५५/२०१५ अन्वये आदेश दिला आहे. सदर दाव्याच्या अनुषंगाने मे. राष्ट्रीय हरीत लवाद यांनी नदीतील नाल्याचे प्रदुषण तपासण्यासाठी आय.आय.टी., मुंबई यांची नियुक्ती केलेली आहे. आय.आय.टी.मुंबई यांनी सविस्तर अहवाल सादर केला असुन त्यांनी केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने नाल्यामध्ये मलवाहिन्यांची कनेक्टिव्हिटी करणे, मोठ्या व्यासाच्या मलवाहिन्या टाकणे, या कामांसाठी र.रु.५७.०० कोटींचे पुर्वगणनपत्रक तयार करून त्यानुसार निविदा प्रक्रिया करून जागेवर काम सुरू करण्यात आलेले आहे.
- सदर कामामध्ये ४५० मिमी. ते १६०० मिमी. व्यासाचे सुमारे ५१ किमी. लांबीच्या मलवाहिन्या विकसीत करणेचे काम प्रस्तावित असून त्यापैकी २२ किमी. लांबीच्या मलवाहिन्यांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे, उर्वरीत कामे प्रगती पथावर आहे.
- पुणे मनपा हद्दीतील व नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी मैलापाणी वहन व्यवस्थेबाबत मास्टर प्लॅन तयार करणेचे काम प्रगतीपथावर आहे.
- पुणे शहरातील व नव्याने समाविष्ट ११ गावांमधील क्षेत्राची विविध ड्रेनेज डिस्ट्रीक्ट (झोन) मध्ये विभागणी करणे या विभागामध्ये प्रभाग निहाय माहिती संकलित करणेचे काम सुरू आहे.
- पुणे शहरातील १५ पैकी १२ ड्रेनेज डिस्ट्रीक्ट (झोन) मधील अस्तित्वातील मलवाहिन्यांचे सर्वेक्षण करणेचे काम पूर्ण झाले असून हायड्रॉलिक मॉडेलिंगचे काम प्रगती पथावर आहे.

**स्ट्रॉम वॉटर प्रकल्प**

- पुणे महानगरपालिकेमार्फत तरतूद उपलब्ध करून स्ट्रॉर्म वॉटर मास्टर प्लॅनच्या आधारे टप्पा क्र.१ (सन २०१७-१८) र.रु.१७५.५० कोटी दुसरा टप्पा क्र.२ सन २०१७-१८ र.रु.१००.०३ कोटी राबविण्यात आला आहे.
- उर्वरीत कामापैकी टप्पा क्र.३ (सन २०१८-१९) या आर्थिक वर्षामध्ये सदर प्रकल्पीय कामाकरिता र.रू. ४३.०० कोटी एवढी रक्कम उपलब्ध आहे. तांत्रिक छाननी समितीने र.रू. ८५.९४ कोटीचे पुर्वगणनपत्रकास मान्यता देण्यात आलेली असून निविदा काढण्यात आलेल्या आहेत.

**सन २०१९-२०**

- मौजे भिलारेवाडी, मांगडेवाडी व गुजर-निंबाळकरवाडी या ग्रामपंचायत हद्दीमध्ये मुख्य मलवाहिन्या विकसीत करणेस मा. मुख्य सभा ठ.क्र.१०३४, दि. २३.०२.२०१८ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर काम केल्यामुळे नानासाहेब पेशवे (कात्रज) तलावाचे मैलापाण्यामुळे होणारे प्रदुषण रोखणे शक्य होणार आहे.
- राजीव गांधी प्राणीसंग्रहालय तलावामध्ये येणारे सांडपाणी संकलन करणे व त्यावर प्रक्रिया करणे सन २०१९-२० मध्ये प्रस्तावित आहे.
- **स्ट्रॉम वॉटर प्रकल्प**

  स्ट्रॉम वॉटर प्रकल्पाच्या उर्वरित कामासाठी सन २०१९-२० मध्ये र.रू. ४० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे.

## (३) <u>घनकचरा व्यवस्थापन(भांडवली तरतूद र. रु.८६.३६ कोटी + महसूली तरतूद र.रु. ४६०.५४ कोटी =५४६.९० कोटी)</u>

**सन २०१८-१९**

**प्रकल्पीय कामे -**

- मे. संस्कृती इंजिनियरिंग प्रा.लि.वडगांवशेरी प्रकल्पामार्फत २५ मे.टन दैनंदिन यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्यात येते.
- मे. साईराम इंजीनीअरिंग प्रा.लि.केशवनगर प्रकल्पामार्फत ५० मे.टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्यात येते.
- मे. आदर्श कन्स्ट्रक्शन प्रा.लि.रामटेकडी प्रकल्पामार्फत २५ मे.टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्यात येते.
- मे. संस्कृती इंजीनीअरिंग प्रा.लि.बिबवेवाडी प्रकल्पामार्फत ५० मे.टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्यात येते.
- **पुणे शहरातील रामटेकडी हडपसर येथे कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पाचे मे. ऑरगॅनिक रिसायकलिंग सिस्टिम्स् प्रा. लि., तर्फे एसपीव्ही पुणे बायो एनर्जी यांचे मार्फत उभारले जाणाऱ्या ७५० मे.टन प्रकल्प -**
- सदर प्रकल्प उभारणीसाठी मा. स्थायी समिती व मा. महापालिका मुख्य सभा यांची दि. २०.०२.२०१८ मंजुरी घेण्यात आलेली असून सदर प्रकल्प चालकाबरोबर दि. २९.०६.२०१८ रोजी नव्याने करारनामा करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पातून ७५० मे. टन. कचऱ्यावर प्रक्रिया करून १३.५ मेगावॅट इतकी वीज निर्मिती करण्यात येणार आहे.

- सदर प्रकल्प उभारणीसाठी रामटेकडी-हडपसर येथील १० एकर जागा प्रकल्प चालकाच्या ताब्यात देण्यात आलेली असून सदर जागेवर संरक्षक भिंत उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे. माहे ऑगस्ट २०१८ रोजी पासुन स्थापत्य विषयक पायाभूत कामे देखील सुरू करण्यात आली असुन मशिनरी/इन्फ्रा उभारणी करण्यासाठी पाच ते सहा महिन्यांचा कालावाधी लागू शकणार आहे.

**उरुळी फुरसुंगी कचरा डेपो येथे १००० मे.टन. क्षमतेचा बायोमायनिंग प्रकल्प उभारणे व चार वर्षे मुदतीकरीता देखभाल दुरूस्ती करणे –**

- उरूळी फुरसुंगी कचरा डेपोवर सुमारे ९ लक्ष मे.टन इतका जुना कचरा साठलेला आहे. सदर कचऱ्यामुळे स्थानिक नागरिकांना होत असलेल्या त्रासामुळे मे. राष्ट्रीय हरित लवाद यांचेकडून पुणे मनपाला दिलेले आदेश तसेच व घनकचरा व्यवस्थापन नियमावली, २०१६ मधील परिशिष्ट क्र. १ मध्ये नवीन शास्त्रोक्त पध्दतीचे भुभराव कार्यान्वित केल्यावर जुने डंपिंग साईट बंद करून सदर ठिकाणी बायो-मायनिंगमार्फत जागा मोकळी करणे असे नमूद केले आहे.

- बायोमायनिंग या प्रक्रियेद्वारे कचरा डेपा वर उघड्यावर टाकण्यात येणाऱ्या जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्या कचऱ्यातून आर.डी.एफ. Soil, Recyclable Material व Rejectही उप उत्पादनेवेगवेगळे करून त्याचा घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियमावली २०१६ च्या अनुषंगाने विल्हेवाट लावून सदर कचऱ्याची जागा मोकळी करून घेण्यात येते.

- चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ बजेटमध्ये याकरिता CE19A178 या अर्थशिर्षकावर र.रु. ११.६८ कोटी इतकी तरतूद उपलब्ध करण्यात आली असून र.रु. ५.८१ कोटी खर्च चालू आर्थिक वर्षात गृहीत धरलेला असून पुढील चार वर्षात उर्वरित आर्थिक तरतूद उपलब्ध होणेकरिता महापालिका अधिनियम ७२ 'ब' अन्वये मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची दि. २२.१०.२०१८ रोजी मान्यता घेण्यात आलेली असून मे. भूमी ग्रीन एनर्जी यांना सदर कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

**उरुळी फुरसुंगी कचरा डेपो येथे शास्त्रोक्त भु-भराव (Sanitory Landfill) करणे.**

- शहरामध्ये निर्माण होणाऱ्या ओला व सुक्या कचऱ्यावर प्रकल्पामध्ये प्रक्रिया केल्यानंतर रिजेक्ट शिल्लक राहते. सदर रिजेक्टचे प्रमाण निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे सुमारे १५ ते २०% असते.सदर रिजेक्ट जिरविणेकरीता शास्त्रोक्त भु-भराव करणे. घनकचरा हाताळणी नियमावली २०१६ नियामानुसार बंधनकारक आहे.

- मनपाकडून सन २०१८-१९ बजेटमध्ये याकरिता CE19A157या अर्थशिर्षकावर र.रु. १०.९५ कोटी इतकी तरतूद उपलब्ध करण्यात आले आहेत. सदर कामाचे १० एकर जागेकरिता पूर्वगणनपत्रक तयार करण्यात आले असून ते र.रु.१९ कोटी आहे.

- सदर प्रकल्प चार महिने कालावधीत पूर्ण करण्यात येणार असून तद्नंतर १ वर्षे कालावधी करिता सदर भु-भरावात रिजेक्ट घेणेसाठी देखभाल दुरुस्ती खर्च दयावा लागणार आहे. यामुळे प्रकल्पामधील रिजेक्ट तसेच बायोमायनिंग प्रक्रिया झाल्यानंतर निर्माण होणारे रिजेक्ट असे एकत्रित मिळून सुमारे ९०० मे.टन. रिजेक्ट या शास्त्रोक्त भु-भरावात घेण्यात येणार आहे.

## सन २०१९-२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

**प्रकल्पीय कामे –**

- सन २०१९-२० अंदाजपत्रकात भांडवली कामासाठी तरतूद र.रु. ६९.४२ कोटी.
- केशवनगर प्रकल्पामार्फत १०० मे.टन, आंबेगाव प्रकल्पामार्फत १०० मे.टन, लोहगाव प्रकल्पामार्फत १०० मे.टन, हडपसर-रामटेकडी प्रकल्पामार्फत २०० मे.टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्यात येणार आहे.
- मे. संस्कृती इंजिनियरिंग, बिबवेवाडी प्रकल्पामार्फत ५० मे.टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्यात येणार आहे.
- भूगांव व फुरसुंगी येथे नवीन रॅम्प उभारणे.
- देवाचीउरूळी येथे १० एकर जागेवर शास्त्रोक्त पध्दतीने भूभराव करणे.

**पुणे शहरातील रामटेकडी हडपसर येथे कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पाचे मे. ऑरगॅनिक रिसायकलिंग सिस्टिम्स् प्रा. लि., तर्फे एसपीव्ही पुणे बायो एनर्जी यांचे मार्फत उभारले जाणाऱ्या ७५० मे.टन प्रकल्प –**

- माहे डिसेंबर २०१९ अखेर प्रकल्प उभारणी पूर्ण होऊन ७५० मे. टन प्रतिदिन या प्रमाणे पूर्ण क्षमतेने प्रक्रिया सुरू होणार आहे.
- जुलै २०२० अखेर सदर प्रकल्पाची उभारणी पूर्ण होऊन वीज निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**उरुळी फुरसुंगी कचरा डेपो येथे १००० मे.टन. क्षमतेचा बायोमायनिंग प्रकल्प उभारणे व चार वर्षे मुदतीकरीता देखभाल दुरूस्ती करणे –**

- सन २०१९-२० या अंदाज पत्रकात सुमारे र.रु. १५ कोटी इतकी रक्कम प्रस्तावित केलेली आहे.

**उरुळी फुरसुंगी कचरा डेपो येथे शास्त्रोक्त भु-भराव (Sanitory Landfill) करणे.**

- सन २०१९-२० या अंदाज पत्रकात सुमारे र.रु. १२ कोटी इतकी रक्कम प्रस्तावित केले असून देखभाल दुरुस्तीकरीता र.रु. ३ कोटी प्रस्तावित केले आहे.
- **सफाई कर अंतर्गत वापरकर्त्ता शुल्क –**
- पुणे शहरातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैंनदिन शहर स्वच्छता कचरा संकलन, साठवणुक, वाहतुक, प्रक्रिया व विल्हेवाट इत्यादी सेवांसाठी कर संकलनातून मिळणारे उत्पन्न व होणारा खर्च यामध्ये तफावत असल्याने कमी पडणाऱ्या रकमेचे समायोजन करण्यासाठी उपभोक्ता फी/वापरकर्ता शुल्क आकारणी करण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेकडे दि. १६.१०.२०१८ अन्वये मंजुरीस सादर केलेला आहे.
- घनकचरा विभागास दरवर्षी मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार केल्यास आजमितीस मालमत्ता करा अंतर्गत स्वच्छता करापोटी आकारण्यात येणारे शुल्क हे एकमेव उत्पनाचे स्त्रोत आहे.
- शासनाच्या घनकचरा (व्यवस्थापन हाताळणी), नियम २०१६ नुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थाने घनकचरा व्यवस्थापनासाठी होणाऱ्या एकुण खर्चासाठी तुलनेत त्या शहरातील नागरिकांकडून वापरकर्ता शुल्क (User Charges) आकारणी बंधनकारक आहे व त्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणतेही स्वंतत्र अनुदान मिळू शकणार नाही. महानगरपालिकेकडील RE19A125 या अंदाजपत्रकीय अर्थशीर्षकावर र.रू. १०० कोटी प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. अर्थशीर्षकाचे नामनिर्देशन पुढीलप्रमाणे आहे. – घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, कंटेनर मुक्त शहर करणे.

- सदर अर्थशीर्षकामधुन संपुर्ण शहरातील ४१ प्रभागांमध्ये कचरा संकलन व प्राथमिक वाहतुक रॅम्प पर्यंत करणे असे कामकाज निविदा मागवुन करण्यात येणार आहे. यामुळे घरोघरी जाऊन वर्गीकृत कचरा संकलन करण्याचे प्रमाण सुमारे १००% पोहचविणे शक्य होणार आहे.
- शहरातील Public Toilet व Community Toilet ची स्वच्छताOutsourcing तत्वावर करण्यात येणार आहे, यासाठी र.रू. २.५० कोटी तरतूद करण्यात आली आहे.

## (४) <u>आरोग्य (महसूली तरतूद र.रु.२४६.२६ कोटी)</u>

**सन २०१८-१९**

- **एम.आर.आय.प्रकल्प-** पुणे महानगरपालिकेच्या कै.शिवशंकर पोटे दवाखाना पद्मावती, सहकारनगर येथे पुणे मनपा व डॉ.कदम डायग्नोस्टिक्स सेंटर यांचे संयुक्त विद्यमाने पी.पी.पी.तत्वावर रेडिओलॉजिकल सेवासुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.या ठिकाणी एम.आर., एक्सरे, सोनोग्राफी इत्यादी सेवासुविधा माफक दरामध्ये रूग्णांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.सदरचा प्रकल्प ५ वर्षे मुदतीकरीता पी.पी.पी.तत्वावर सुरू करण्यात आलेला आहे.या ठिकाणी 3.0 Teslaएम.आर.आय.मशिन बसविण्यात आलेली आहे व सी.जी.एच.एस.दरापेक्षा ५% कमी दराने सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.
- **डायलेसिस प्रकल्प-** पुणे शहरातील किडनीच्या आजाराने ग्रस्त असलेल्या व डायलेसिसची आवश्यकता असणाऱ्या गरजू रूग्णांकरीता पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालय मंगळवार पेठ, स्व.राजीव गांधी रूग्णालय येरवडा,कै.नामदेव शिवरकर दवाखाना वानवडीव हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना,मित्रमंडळ चौक पर्वती या चार ठिकाणी पुणे मनपाच्या संयुक्त विद्यमाने ५ वर्षे मुदतीच्या कराराने र. रू. ४००/- (विदाऊटकन्ज्युमेबल्स) इतक्या माफक दरामध्ये रूग्णांना सेवा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.या चार ठिकाणापैकी कमला नेहरू रूग्णालय येथे सध्या सदरची सेवा सुरू आहे आणि उर्वरीत तीन ठिकाणी येत्या दोन महिन्यात डायलेसिसच्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.
- **नेत्रचिकित्साविषयक सेवासुविधा-** पुणे महानगरपालिकेच्या भाऊ पाटील रोड,बोपोडी येथील कै.दत्तात्रय वळसे पाटील दवाखाना येथे पुणे मनपा व व्हिजन नेक्सट फांउडेशन यांचे संयुक्त विदयमाने पी.पी.पी.तत्वावर चालविण्यात देण्यात आलेला आहे. सदर दवाखान्यामध्ये नेत्रचिकित्सा विषयक सेवासुविधा माफक दरात उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
- **ज्येष्ठ नागरीकांची डे-केअर सुविधा-** ज्येष्ठ नागरिक व अतिवृध्द नागरिक यांना आरोग्यविषयक सेवा पुरविण्यासाठी डे-केअर सेंटरच्या धर्तीवर पुणे महानगरपालिकेच्या थरकुडे दवाखाना एरंडवणा येथील जागेत पुणे मनपा व कर्नल क्युब यांचे संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरीकांना आरोग्य विषयक सेवा पुरविण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने पी.पी.पी.तत्वावर ५ वर्षे मुदतीच्या कराराने येथे प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे.
- **एन.आय.सी.यु. -** पुणे महानगरपालिका, मुकुंद माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडिया लिमिटेड यांचे संयुक्त विद्यमाने सी.एस.आर. अंतर्गत पुणे मनपाचे भारतरत्न स्व. राजीव गांधी रुग्णालय व कै.चंदुमामा सोनवणे प्रसुतिगृह येथे प्रत्येकी १२ बेड्सची क्षमता असलेले एन.आय.सी.यु. विभाग कार्यान्वित करण्यात आले आहेत.

- **मृत प्राण्यांची शास्त्रीय दृष्ट्या विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने इन्सिनेरेटर प्लॅन्ट उभारणे –** र.रु.१.८० कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. सदर इन्सिनेरेटर हा ७०० ते ९०० किलोग्रॅम क्षमतेचा असून सदर प्लॅन्टची उभारणी विद्युत खात्याकडून करण्यात आलेली असून सदर प्लॅन्ट कार्यान्वित झालेला आहे.
- या व्यतिरिक्त पाळीव मृत कुत्रे/मांजर तसेच मृत भटकी कुत्रे यांची विल्हेवाट लावण्यासाठी नायडू हॉस्पीटल येथे स्वतंत्र इन्सिनेरेटर कार्यान्वित झालेला आहे.

**सन २०१९–२०**

- **जन्मजात कर्णबधीर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन व सर्वांगीण विकास–** पुणे महानगरपालिकेच्या बिंदू माधव ठाकरे दवाखाना येथे पुणे मनपा व कॉक्लिआ पुणे फॉर हिअरींग ॲन्ड स्पीच यांचे संयुक्त विदयमाने ५ वर्षे मुदतीच्या कराराने चालविण्यात देण्यात येणार आहे. पुणे महापालिकेच्या दवाखान्यामधून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सेवासुविधा खालीलप्रमाणे.

  **अ)निदान–** बालकांच्या विशिष्ट प्रकारच्या वैद्यकीय व Audiological(Bera, OAE, Free Field Audiometry)विशिष्ट तपासण्या करून निदान केले जाईल या तपासण्या अगदी एक दिवसाच्या बालकापासून ते सहा वर्षापर्यंतच्या बालकापर्यंत केल्या जातील.

  **ब) समुपदेशन–** सदर बालकाच्या मातेचे/पालकांचे समुपदेशन करण्याची नितांत आवश्यकता आहे. समुपदेशन केले नाही तर नैराशेमुळेबालसंगोपनात अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्यानेमानस शास्त्रज्ञातर्फे समोयचित मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

  **क)प्रशिक्षण–** अशा प्रकारच्या बालकांना आवश्यकतेनुसार श्रवणयंत्र लावून नियमित वाचा भाषा प्रशिक्षण वयाच्या सहा वर्षापर्यंत मिळणे जरूरीचे असते, त्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

- **बर्न पेशंट वॉर्ड –** पुणे मनपाचे कै.चंदुमामा सोनवणे प्रसुतिगृहाचे तीन मजली जुन्या इमारतीमध्ये बर्न व स्ट्रोक वॉर्ड प्रोजेक्ट सुरू करण्यात येणार आहे.
- पुणे शहरातील तलाव व नद्या जलपर्णी मुक्त करणेसाठी र.रू. ५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

## (५) <u>नगर नियोजन</u>

**सन २०१८–१९**

- **महत्त्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविण्यपूर्ण योजना/प्रकल्पांची नावे, ठळक बाबी**
- **पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट ११ गावांचा प्रारूप विकास आराखडा व बांधकाम परवानगी –** दि. ०४.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार नव्याने ११ गावे पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आली आहेत. समाविष्ट ११ गावांचा प्रारुप विकास आराखडा करण्याबाबत मा. मुख्य सभेने ठराव क्र. ८७४, दि. २१.१२.२०१७ अन्वये कार्यवाही चालू करण्यास मान्यता दिली आहे. एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २३ अन्वये मा. मुख्य सभा ठराव क्र. १६०, दि.२८.०६.२०१८ नुसार दि.०४.१०.२०१८ रोजी शासकीय राजपत्रात व दैनिक वर्तमानपत्रामध्ये इरादा जाहीर करण्यात आलेला आहे. तसेच एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २४ अन्वये नगर नियोजन अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

- विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच भविष्यकालीन आढावा घेण्यासाठी लोकसंख्या, सामाजिक, आर्थिक विश्लेषण या करिता गोखले इन्स्टिट्युटस ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स या संस्थेची नेमणूक केलेली आहे. समाविष्ट ११ गावाचा हद्दी दर्शविणारा नकाशा जाहीर प्रकटनासह प्रसिध्द करणेत आलेला आहे. त्यातूनच विद्यमान जमीन वापर नकाशा पुणे महानगरपालिकेमध्ये तयार करण्यात येत आहे.
- **मौजे येवलेवाडी** – मौजे येवलेवाडी गावाचा प्रारूप विकास आराखडा मा. मुख्य सभेच्या मान्यतेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये मे. शासनास अंतिम मंजूरीकरीता दिनांक १२.१०.२०१८ रोजी सादर करण्यात आला आहे.
- महाराष्ट्र शासनाचे नगर विभागामार्फत शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१४/प्र.क्र. ८२/१४/नियम व नवि-१३, दि. ०७/१०/२०१७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२(क) नुसार अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८(१) अन्वये नियमावली प्रसिध्द केली आहे. सदर नियमावलीनुसार नियमात बसणारी पुणे महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार वसूल करुन प्रशामित सरंचना (कंपाऊंडींग स्ट्रक्चर) म्हणून घोषित करणेत आलेली असून त्याद्वारे र.रु.१२.६३ कोटी प्रशमित संरचना फी म्हणून जमा झालेली आहे.
- **प्रधानमंत्री आवास योजना**

  प्रधानमंत्री आवास योजना सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे ही महत्वकांक्षी योजना सुरू केलेली आहे. पुणे शहरातील पात्र लाभार्थ्यांना घरे देण्याचे पुणे महानगरपालिकेचे उदिद्ष्ट आहे. या योजनेचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यामधून परवडणाऱ्या घरांची निर्मिती होणार आहे.

  पुणे महानगरपालिकेकडून अल्प उत्पन्न गटातील (EWS)सदनिका बांधण्यासाठी हडपसर, खराडी, वडगाव (खुर्द) या परिसरातील एकुण ८ (आठ) सविस्तर प्रकल्प अहवाल मे. शासनाने मंजूर केलेले असून त्यामधून एकुण ६,२६४ सदनिका उपलब्ध होणार आहेत.

  प्रत्येक सदनिकेचे क्षेत्रफळ ३० चौ.मी. पर्यंत आहे. सदर ८ प्रकल्पांचा एकुण खर्च साधारण र. रू. ७०० कोटी इतका आहे. सदर योजनेकरिता सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रकात र.रू.२९.२० कोटींची तरतूद आहे.सदर प्रकल्पांच्या बांधकामासाठी निविदा मागविण्यात आली असून लवकरच जागेवर बांधकाम सुरू करण्यात येईल.पात्र अर्जदाराना अर्थसहाय्य व मार्गदर्शनासाठी माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये मेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर मेळाव्यामध्ये साधारण ७५०० कुटुबांनी याचा लाभ घेतला.

## सन २०१९-२०चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- **नगर रचना परियोजना (टि.पी. स्कीम)-**

  पुणे महानगरपालिका मुळहद्द व समाविष्ट २३ गावे या ठिकाणी नवीन टि.पी. स्कीम राबविण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी मे. केंद्र शासनाने अमृत योजने अंतर्गत प्रायोगिक तत्वावर देशभरात २५ शहरांची निवड केलेली असून त्यामध्ये पुणे शहराचा समावेश आहे. एका प्रायोगिक तत्वावरील टी.पी. स्कीमकरीता मे.केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त होणार आहे.

  पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांपैकी फुरसुंगी व देवाचीउरूळी या दोन गावांमध्ये टि. पी. स्कीम राबविण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या माध्यमातून बाहयवळण रस्त्याची जागा कोणतेही भूसंपादन न करता ताब्यात मिळणार आहे.

- **११ गावांचा प्रारुप विकास आराखडा** –विद्यमान जमीन वापर नकाशा व अहवाल तसेच एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २६ अन्वये प्रारुप विकास आराखडा तयार करुन नागरिकांच्या हरकती व सूचना मागवून विकास आराखड्याची संपूर्ण वैधानिक प्रक्रीया पूर्ण करुन प्रारुप विकास आराखड्यास मा.मुख्य सभेची मान्यता घेऊन मे. शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यात येणार आहे.
- **प्रधानमंत्री आवास योजना** –सार्वजनिक–खाजगी तत्वावर खाजगी विकसकांमार्फत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत प्रस्ताव मागविण्यात आले असुन, या अंतर्गत साधारण १०,००० घरकुलांची निर्मिती करण्याचे नियोजन आहे.

## (६) <u>वाहतूक नियोजन व प्रकल्प(भांडवली तरतूद र. रु.२५२.०९ कोटी + महसूली तरतूद र.रु. ११.०० कोटी = २६३.०९ कोटी)</u>

**सन २०१८–१९**

- **सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व विशेष प्रकल्प –**
- **अलंकार थिएटरजवळ रेल्वे ओव्हरब्रीज बांधणे –** रेल्वे स्टेशन रस्त्याने जाणाऱ्या रेल्वे उड्डाणपुलाचे रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले. सदर काम पूर्ण होवून हा पुल दिनांक २५.१२.२०१८ रोजी वाहतुकीस खुला केलेला आहे.
- **मुंढवा स.नं.८९ व ७१ दरम्यानचे पुणे–सोलापूर रेल्वे लाईनवर २४ मी. एच.सी.एम.टी.आर. साठी रेल्वे ओलांडणी पुल बांधणे –** हडपसर अँमनोरा पार्क मगरपट्टा सिटी येथील वाहतूक मुंढवा येथील मुख्य रस्त्याने जात असल्याने सदर रस्त्यावर वाहतूक कोंडी होतेत्यासाठी सदर पूलाचे नियोजन करणेत आले. या पुलाचे काम पूर्ण झालेले असून पुल वाहतुकीस खुला करणेस तयार आहे.
- **डेक्कन कॉलेज रोड येरवडा येथे कॉलेजचे गेट समोर पादचारी उड्डाणपुल बांधणे –** डेक्कन कॉलेज संस्थेचा पुरातत्वविभाग व मुख्य कॅम्पस यांना जोडणारा पादचारी उड्डाणपुल बांधणेबाबत संस्थेची बऱ्याच वर्षापासूनची मागणी होती. त्यानुसार प्रत्यक्ष जागेवर काम पूर्ण करणेत आले आहे.
- **रामवाडी भुयारी मार्गांचे उर्वरित काम पूर्ण करणे –** सदर कामाचे पूर्वगणनपत्रकासर.रू.४.२६ कोटी व निविदा र.रु.३.८३ कोटी इतकी आहे. सब–वे च्या स्लॅबचे काम पूर्ण झाले असून, दोन्ही बाजूने वाहतूक सुरु करणेत आली आहे.
- **लुल्लानगर चौकात उडड्राणपुल बांधणे –** पुणे कॅन्टोनमेंटकडून कोंढव्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील लुल्लानगर चौकात उडड्राणपुल बांधण्याचे काम पुणे महानगरपालिकेतर्फे सुरू आहे. सद्यस्थितीत पुलाचे ८०% काम पूर्ण झाले असून मार्च २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
- **डेंगळे पुलास नवीन समांतर पुल तयार करणे –** अस्तित्वातील जुना डेंगळे पुल वाहतुकीसाठी कमी पडत असल्याने नवीन पुल बांधणेचे काम हाती घेणेत आले. सद्यस्थितीत पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच पुल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.

**सन २०१८–१९ मध्ये सुरु असलेले प्रकल्प/योजना**

- **हॅरिस पुलालगत नवीन पुल बांधणे –** जुन्या पुणे–मुंबई रस्त्यावर बोपोडी येथे ब्रिटीशकालीन हॅरिस पुल असून, सदरचा पुल जुना झाला असल्याने सदर पुलाचे बांधकाम हे पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपाकडून संयुक्तपणे आर्थिक तरतूद वापरुन करणेत येत आहे.

- **सेव्हन लव्हज चौक ते वखार महामंडळचौक उड्डाणपुल बांधणे–**सेव्हन लव्हज चौक ते वखार महामंडळ चौक या दरम्यानच्या पुलाचे काम हाती घेणेत आलेले आहे. या कामासाठी सुमारे र. रू. ३० कोटी इतका खर्च होणे अपेक्षित आहे.

- **वडगावशेरी येथील पुण्यनगरी सोसायटी शेजारी स.नं. ३९ मधील वाहनतळासाठी आरक्षित जागेत पार्किग इमारत बांधणे–** पुणे वडगांव शेरी स. नं. ३९/४/३/९ पैकी ॲमेनिटी स्पेस क्षेत्र १४२६.७५ चौ. मी. ॲमेनिटी स्पेस क्षेत्रावर पी– ३२ नुसार पार्किंग आरक्षण असून या जागेत दुमजली पार्किंग इमारत बांधण्यात येणार असून त्यामध्ये ८७ दुचाकी व ९० चारचाकी पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. या कामासाठी सुमारे १.८५ कोटी इतका खर्च होणे अपेक्षित आहे.

- **पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प–** पुणे महानगरपालिका क्षेत्रात मेट्रो रेल्वे कार्यान्वित करणेस मे. राज्य शासन व मे. केंद्र शासन यांची मान्यता मिळाली असून त्यानुसार पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पातील मार्गिका क्र. १ पिंपरी चिंचवड ते स्वारगेट व मार्गिका क्र. २ वनाझ ते रामवाडी या प्रस्तावित मार्गांचे काम प्रगतीपथावर आहे.

  त्यासोबतच पुणे महानगर मेट्रो प्रकल्पाच्या स्वारगेट ते कात्रज अशा विस्तारीत मेट्रो मार्गिकेस तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी स्वारगेट ते कात्रज (फेज २) या मेट्रोरेल मार्गिकेचा डिपीआर बनविणेचे कामी SYSTRA-AECOM-EGIS-RITES (Consortium)यांची नियुक्ती केली आहे. सदर कामासाठी र. रु. ७६.२८ लाख अधिक १२% जीएसटी इतका खर्च येणार असल्याचे महामेट्रो रेल कॉर्पोरेशन यांनी कळविलेले आहे. त्यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना सदर रक्कम आदा करावी लागणार आहे.

- तसेच मा. स्थायी समिती पुणे महानगरपालिकेने वनाझ ते रामवाडी या मेट्रो मार्गिकेचे काम प्रगतीपथावर असताना वनाझ ते चांदणी चौक (शिवसृष्टी) पर्यंतच्या वाहतूकीचा प्रश्न सोडविणेकरीता वनाझ ते चांदणी चौक (शिवसृष्टी) पर्यंत मेट्रो मार्ग विस्तारीत करण्यासाठी व त्याचा डिपीआर तयार करणेसाठी मान्यता दिलेली आहे.

- **शहरी एकात्मिक सायकल योजना –** सार्वजनिक सायकल योजना आराखडा मा.मुख्य सभा, पुणे महानगरपालिका ठराव क्र.६९३ दिनांक १४.१२.२०१७ अन्वये मान्य करणेत आला. सदर मान्यतेस अनुसरुन (१) Mobike B.V. (2) YULU BIKE PRIVATE LIMITEDव (3) Zoomacar India Private Limitedयांचे समवेत सामंजस्य करारनामा करणेत आला आहे. सदर कंपन्यामार्फत पुणे शहरातील विविध ठिकाणी आतापर्यंत सुमारे ८ हजार सायकल पुरविण्यात आल्या आहेत. त्यामुळे स्वयंचलित वाहन वापरणेचे प्रमाण कमी होवून रस्त्यावरील वाहतूक कोंडी व पर्यायाने प्रदूषण कमी होणेस मदत होणार आहे. पब्लिक बायसिकल शेअरिंग योजनेमुळे पुणे महानगरपालिकेस कोणतीही आर्थिक तोशिष लागणार नाही.

- पुणे शहरामध्ये एकंदर ८२४ कि.मी. सायकल ट्रॅक तयार करण्याचे काम टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात येणार असून यासाठी सुमारे र. रु. ३३५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम पुढील पाच वर्षात करण्यात येणार आहे.

## सन २०१८-१९ मधील सुरु असलेल्या नाविन्यपूर्ण योजना

- **हडपसर मध्येकाळेपडळ व रामटेकडी येथीलगेट क्र. ६ व ७ तसेचगेटक्र.७ व ८ या दरम्यानहलक्यावाहनांकरीता भुयारी मार्गाचे बांधकाम करणे –** हडपसर व रक्षकनगरकडून महमंदवाडी व हांडेवाडीकडे जाणारी व येणारी वाहने विनाअडथळा येजा करणेसाठी, काळेपडळ व रामटेकडी येथील गेटक्र . ६ व ७ तसेच गेटक्र. ७ व ८ या दरम्यानच्यालांबीत दोन भुयारी मार्ग प्रस्तावित करणेत आले आहेत.सदरहु काम रेल्वेप्रशासनामार्फत कार्यान्वितकरणेत येणार असून यासाठी सुमारे र. रू. ८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च पुणे महानगरपालिके तर्फे रेल्वेप्रशासनासआदाकरणेत येणार आहे.याकामाकरीता सन २०१८-१९ मध्ये र.रु. ५.८४ कोटी इतकी तरतूद उपलब्ध आहे.

- **मुंढवा येथे मुळा मुठा नदीवरील जुन्या पुलाची दुरुस्ती करणे व तद्नुषंगिक कामे करणे–**नदीवरीलजुन्या पुलाची दुरुस्ती व मजबुतीकरण केल्यामुळे पुलाचे आयुष्य वाढणार आहे. तसेच मुंढवा व खराडीकडे मार्गस्थहोणाऱ्या वाहनाकरीता सुविधा उपलब्ध होणार आहे. सन २०१९-२० साठी या कामाकरीता र. रू. ८.०० कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

- **जुन्या पुलांची दुरूस्ती करणे** – पुणे महानगरपालिकेमार्फत सन २०१३-१४ मध्ये एकुण १८ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करणेत आलेले होते. त्यापैकी ८ पुलांची दुरूस्तीविषयक कामे पूर्ण करणेत आलेली असून संगम दगडी पुल, संगम आर.सी.सी. पुल, वि.भा. पाटील पुल, राजीव गांधी पुल, गाडगीळ पुल इ. पुलांच्या दुरूस्तीची कामे सुरू आहेत. तसेच सन २०१८-१९ मध्ये यापूर्वी स्ट्रक्चरल ऑडीट करणेत आलेल्या १८ पुलांव्यतिरिक्त २० वर्षापेक्षा जुन्या आणखी १२ पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करणेत आले असून स्ट्रक्चरल ऑडिटच्या रिपोर्टनुसार आवश्यक त्या दुरूस्त्या करणेत येणार आहेत. या कामासाठी सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात र. रू. ८.७६ कोटी इतकी तरतूद उलपब्ध असून सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात या कामाकरीता र. रू. १२ कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

- **राजाराम पुल येथे बंडगार्डन आर्ट प्लाझाच्या धर्तीवर पेडेस्ट्रीयन प्लाझा विकसीत करून सुशोभिकरण करणेः–** राजाराम पुलाच्या अपस्ट्रीम बाजूला नदी पात्राचे भागात पेडेस्ट्रीयन प्लाझा तयार करण्याचे नियोजन आहे. सदर पेडेस्ट्रीयन प्लाझाला बाकडे, पादचारी मार्ग, झाडे-रोपे, योगासने व प्राणायाम याकरीता मोकळी जागा इ. ची व्यवस्था करण्यात येणार आहे. प्रस्तुत कामाकरीता र. रु. २.९१ कोटी इतक्या रक्कमेचे पूर्वगणनपत्रकास मा. तांत्रिक छाननी समितीची मान्यता मिळालेली आहे. सन २०१९-२० चे अंदाजपत्रकासाठी या कामाकरीता र. रु. २.५० कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

- **नळस्टॉप चौकात उडड्डाणपुलबांधणे –** मेट्रो प्रकल्प टप्पा क्र. १ मार्गिका क्र. २ वनाज ते रामवाडी मार्गिकेवर नळस्टॉप चौकात उडड्डाणपूल बांधणेत येत असून सदरचे काम महाराष्ट्र मेट्रोरेल कॉर्पोरेशन लि. यांचे मार्फत करणेत येत आहे.त्यामुळेनळस्टॉप चौक येथील पहिला मजला उड्डाणपुलाचा बांधकाम खर्च र.रु. ३५.२५ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र मेट्रोरेल कॉर्पोरेशन लि. यांना मनपाकडून टप्प्याटप्प्याने आदा करण्यात येणार आहे. सदर कामासाठी सन २०१८-१९ चे आर्थिक वर्षात र. रु. १४.६० कोटी इतकी तरतूद असून सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात या कामाकरीता र.रु. २०.५० कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

- **येरवडा गोल्फ चौक येथे ग्रेडसेपरेटर किंवा सबवे / उडड्ाणपुल बांधणे** – या कामासाठी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करणेत आली. त्यांनी संकल्पचित्र ऑप्शन क्रमांक १ ते ४ तयार केले होते. त्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते शास्त्रीनगर चौक येथे उडड्ाणपूल बांधणे यास मा. तांत्रिक छाननी समितीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार र. रू. २८ कोटी इतक्या रकमेचे पूर्वगणनपत्रक तयार करणेत आलेले आहे. या कामासाठी सन २०१८-१९ चे अदांजपत्रकात र.रू. ३.६५ कोटी इतकी तरतूद उलपब्ध झाली आहे. या कामासाठी जागेचे संपादन आवश्यक असल्याने भूसंपादन कार्यवाहीसाठी भूसंपादन विभागास कळविले आहे.
- **राष्ट्रीय राजमार्ग क्रमांक ४ वरील चांदणी चौकातील रस्त्यांने एकात्मिक विकसनाबाबत**–चांदणी चौक या ठिकाणी राष्ट्रीय राजमार्ग क्र.४(एन.एच.४)जात आहे. सदर भागातील नागरी रस्ते व राष्ट्रीय राजमार्ग यांचा एकत्रित विकास होणेच्या दृष्टीने तेथील सर्वंकष वाहतुक आराखडा तयार करणेत आला. मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १७३ दिनांक १७.०५.२०१६ रोजीचे मान्यतेनुसार भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे महानगरपालिका व मे.एक्स.सी.सी. इंजिनिअर्स ॲन्ड प्लॅनर्स यांचेमध्ये झालेल्या त्रिस्तरीय करारनाम्यानुसार राजमार्ग ४ चे हद्दीबाहेरील सर्व्हिस रस्त्याकरिता लागणारी जागा पुणे महानगरपालिकेने ताब्यात घेऊन ती राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावयाची आहे. युटिलीटी शिफ्टिंगबाबत योग्य ती कार्यवाही चालू आहे. चांदणी चौकातील भूसंपादनासाठी शासनामार्फत र.रू.१८५.४३ कोटी इतकी रक्कम दिनांक ३१ ऑगस्ट २०१८ चे शासन निर्णयानुसार उपलब्ध होणार आहे. चांदणी चौकातील एकात्मिक रस्ते विकसनाचे काम राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात येणार असून सन २०१९-२० चे अंदाजपत्रकासाठी या कामाकरीता र.रू. १५.०० कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत दिले आहेत.
- **पुणे शहरातील घोरपडी येथे पुणे मिरज रेल्वे लाईन व पुणे सोलापूर रेल्वे लाईन क्रॉसिंगवर उडड्ाणपुल बांधणे** – या कामासाठी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करणेत आलेली आहे. पुणे-सोलापूर रेल्वे लाईन व पुणे-मिरज रेल्वे लाईन येथे संलग्न रेल्वे उडड्ाणपुल प्रस्तावित करणेत आलेले आहेत. प्रस्तावित पुलासाठीची जागा पुणे सबएरिया, पुणे कॅन्टोनमेंट,संरक्षण विभाग यांचे अखत्यारित असून रक्षा संपदा विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेमार्फत प्रस्तावित उडड्ाणपुलासाठी दिनांक १२.०८.२०१६ अन्वये Working Permissionदेण्यात आलेली आहे. सदर पत्रातील अटी व शर्तीनुसार काम करणेस मा. मुख्य सभा ठराव क्रमांक ४६४ दिनांक १०.११.२०१७ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. तज्ञ सल्लागार यांनी या प्रकल्पासाठी सुमारे र.रू. १३० कोटी इतका खर्च अंदाजित केलेला आहे. सन २०१८-१९ चे अदांजपत्रकात या कामासाठी र.रू. ७३ लाख इतकी तरतूद उपलब्ध भूसंपादनासाठी र.रू १० कोटी इतकी तरतूद वर्गीकरणाने उपलब्ध करून देणेत आलेली आहे. तसेच सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात या कामाकरीता र.रु.२८ कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.
- **बोपोडी चौक, पुणे मुंबई रस्ता येथे वाहन भुयारी मार्ग व पादचारी मार्ग बांधणे**–या कामासाठी तज्ञ सल्लागारयांची नेमणूक केली असून त्यांचेमार्फत ३ पर्यायी संकल्पचित्रे सादर करणेत आली आहेत त्यापैकी एका संकल्पचित्रास एस्टिमेट कमिटीची मान्यता मिळालेली आहे. या कामासाठी सुमारे १३ कोटी इतका खर्च अपेक्षित असून सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात या कामासाठी र. रू. ३.६५ कोटी इतकीच तरतूद उलपब्ध आहे. तसेच या कामासाठी आवश्यक जागेचा ताबा मिळणेसाठी भूसंपादन विभागामार्फत भूसंपादन कार्यवाही सुरू करणेत आलेली आहे. सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात या कामाकरीता र. रु. १० कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

* **औंध सांगवी रस्त्यावरील अस्तित्वातील पुलाशेजारी नव्याने पुल बांधणे –** या कामासाठी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करणेत आलेली आहे. या कामासाठी सन २०१८–१९ चे अंदाजपत्रकात र.रू.६.९४ कोटी इतकी तरतूद उपलब्ध आहे. तज्ञ सल्लागार यांनी या कामाचे र. रू. २९.१५ कोटी इतक्या रकमेचे पूर्वगणनपत्रक सादर केले असून सदर पूर्वगणनपत्रक मा. इस्टिमेट कमिटीमध्ये मान्य झाले असून निविदा प्रक्रिया सुरु आहे. सदरचा प्रकल्प पिंपरी–चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार आहे. सन २०१९–२० चे अंदाजपत्रकासाठी या कामाकरीता र. रु. ९ कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

* **पुणे शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी करावयाच्या उपाययोजनाकरीता साहित्य पुरविणे –** पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीत करण्यासाठी त्याचप्रमाणे वाहतुक शिस्तबध्द संचलन होण्याच्या दृष्टीने मा. पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत वेळोवेळी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार वाहतूक पोलीस विभागाकडून विविध साहित्यांची मागणी करणेत आलेली आहे. सन २०१८–१९ चे अंदाजपत्रकामध्ये या कामाकरीता र. रु. २.७६ कोटी इतकी तरतूद उपलब्ध झालेली आहे. सदर तरतूदीमधून प्रामुख्याने आवश्यक साहित्य उदा. जॅमर – १००० नग, लोखंडी बॅरिगेटस् – १००० नग, लाईट बॅटन – १००० नग, रिफ्लेक्टीव्ह जॅकेट – १००० नग, प्लॅस्टिक डिव्हायडर – २०० नग, प्लॅस्टिक कोन – ३०० नग व ब्रेथ अनॅलायझर – १०० नग इत्यादी साहित्य वाहतुक पोलीस विभागास मार्च २०१९ अखेर महानगरपालिकेकडून पुरविणेत येणार आहे. यापैकी काही साहित्य ब्रेथ अनॅलायझर व जॅमर पुरविणेत आलेले आहे. तसेच मा. पोलीस उपआयुक्त वाहतूक शाखा, पुणे शहर यांचेमार्फत वेळोवेळी होणाऱ्या साहित्यांच्या मागणीस अनुसरुन आगामी सन २०१९–२० चे अंदाजपत्रकामध्ये या कामासाठी र. रु. ३.०० कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे. या व्यतीरिक्त पुणे शहरामध्ये नव्याने सिग्नल यंत्रणा उभारणे व जुने सिग्नल दुरुस्त करणे या कामासाठी सन २०१९–२० चे अंदाजपत्रकामध्ये र. रु.१ कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

## सन २०१९–२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक –

* सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व विशेष प्रकल्प या अर्थशिर्षकांतर्गत चालू वर्षातील नदीवरील पुल, भुयारी मार्ग तसेच उड्डाणपुलाची कामे प्रगती पथावर आहेत. यामध्ये लुल्लानगर चौक उड्डाणपुल, डेंगळे पुलास समांतर नवीन पुल बांधणे इ. कामे मार्गी लावण्यात येत आहेत. तसेच सन २०१९–२० च्या अंदाजपत्रकात नव्याने मुंबई – बेंगलोर राष्ट्रीय माहामार्ग क्र. ४ वर पाषाण – सूस येथे उड्डाणपुल बांधणे, सिंहगडरोड धायरीफाटा येथे (Y) जंक्शन पुल बांधणे, कल्याणीनगर ते कोरेगावपार्क जोडणाऱ्या (एच.एच.–आगाखान ब्रीज)पुलाचे रुंदीकरण करणे, परिवहन महामंडळाच्या विविध डेपोमध्ये विकसनाची कामे करणे, इलेक्ट्रॉनिक बस (G.C.C. Model) / विकत / पीपीपी इत्यादी धर्तीवर बस उपलब्ध करुन देणे, इ. कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. बालेवाडी पुल हॅरीस पुल यांची कामे पुणे व पिंपरी चिंचवड यांच्या संयुक्त हद्दीवर असल्यामुळे दोन्ही महानगरपालिकांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहेत. तसेच पुणे शहराची वाढती लोकसंख्या व वाहतुकीवर येणारा ताण या बाबींचा विचार करता सक्षम व सुलभ वाहतुकीकरीता पुणे मेट्रो प्रकल्पाचे काम महामेट्रोमार्फत सुरु असून त्याकरीता पुणे महानगरपालिकेचा हिस्सा देण्यात येणार आहे.

**सन २०१९-२० मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना -**

- **कल्याणीनगर ते कोरेगाव पार्क जोडणाऱ्या (एच.एच. आगाखान ब्रीज) पुलाचे रुंदीकरण करणे -** कोरेगावपार्कयेथुन विमानतळाकडे जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत मोठ्याप्रमाणात वाढ होत असून कल्याणीनगर ते कोरेगावपार्क दरम्यानचा अस्तित्वातील पुल अपूरा पडत आहे. सदर पुलाचे रुंदीकरण व्हावे याकरीता स्थानिक नागरिक व मा. सभासद यांचेकडून वारंवार मागणी होत आहे. त्यानुसार सन २०१९-२० चे अंदाजपत्रकासाठी या कामाकरीता र.रु. १० कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.
- **मुंबई - बेंगलोर राष्ट्रीय माहामार्ग क्र. ४ वर पाषाण - सूस येथे उड्डाणपुल बांधणे -** या कामाकरीता तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली असून सर्वसाधारण प्रकल्पाचे संकल्पचित्र (GAD) तयार करुन त्यास राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे तत्वतः ना हरकत पत्र प्राप्त झाले आहे. या प्रकल्पाची प्रकल्पीय रक्कम सुमारे र.रु.३० कोटी इतकी असून सन २०१९-२० चे अंदाजपत्रकासाठी या कामाकरीता र. रु. १५ कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.
- **परिवहन महामंडळाच्या विविध डेपोमध्ये विकसनाची कामे करणे-** पीएमपीएमएल विभागाने दि. १४.०८.२०१८ रोजी दिलेल्या पत्रामध्ये पुणे महानगरपालिका हद्दीमधील विविध डेपो विकसन कामे करुन देणेबाबत मागणी केली आहे. पुणे व शहर हद्दीतील एकूण १० डेपो कार्यान्वित असून त्यापैकी शेवाळवाडी व भेकराईनगर डेपो या ठिकाणी विविध विकास कामे करणे बाकी आहे. तसेच परिवहन महामंडळाच्या ताब्यातील सुतारवाडी, कोथरुड सर्वे नं. ६१ (पार्ट) व बाणेर सर्वे नं. १११ (पार्ट) या ठिकाणी देखील विकास कामे करावयाची आहेत. यामध्ये कॉंक्रीटींग, सिमाभिंत बांधणे, बस दुरुस्ती शेड बांधणे, स्वच्छतागृह, यार्ड लायटींग व इतर आवश्यक विद्युतीकरण इ. मुलभूत स्वरुपाची कामे करणे आवश्यक आहे. डेपो मध्ये करावयाची कामे पुणे मनपामार्फत करुन मिळाल्यास डेपो कामकाजामध्ये सुसूत्रता येऊन बसेस देखभाल दुरुस्तीची कामे अधिक सक्षमतेने होण्यास मदत होऊ शकेल. या करीता सन २०१९-२० चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. ५ कोटीइतकी तरतूद सुचविणेत आली आहे.
- **सिंहगडरोड धायरीफाटा येथे (Y) जंक्शन पुल बांधणे -** उड्डाणपुल उभारत असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील मिळकतींचा ताबा घेणे/ भूसंपादन करणे आवश्यक आहे. तसेच सदर काम करणेसाठी तज्ञ सल्लागार यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. या करीता सन २०१९-२० चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. १०.०० कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.
- पुणे शहरामधील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी व वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस आयुक्त, पुणे शहर व पोलीस उप आयुक्त (वाहतूक शाखा) यांच्याबरोबर आवश्यक त्या विषयांवर समन्वय साधुन विविध कामे केली जातात. उदा. चौक सुधारणा, ट्रॅफिक सिग्नल, दिशादर्शक फलक, वाहतुक चिन्हे, वाहतुक जनजागृती फलक इत्यादी. सदर कामांसाठी पुरेशी तरतूद करण्यात आली आहे.

## (७) पथ(भांडवली तरतूद र. रु.५०३.०० कोटी + महसूली तरतूद र.रु. १९६.७६ कोटी = ६९९.७६ कोटी)

**सन २०१८-१९**

- सन २०१८-१९ चे अंदाजत्रकात पथ विभागामार्फत विविध खोदाई पोटी र.रू.३०.८४ कोटी इतकी जमा डिसेंबर, २०१८ झाली असून खात्याकडे आलेल्या प्रस्तावांचा विचार करता माहे मार्च,२०१९ अखेर दिलेले उद्दिष्ट (र.रू.९९ कोटी) साध्य होणार आहे.

**सन २०१८-१९ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण योजनांचे ठळक मुद्दे**

- **पुणे स्ट्रीट प्रोग्राम अंतर्गत प्रमुख रस्त्यांचे विकसन करणे –** पुणे मनपा हद्दीतील सुमारे १०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचेअर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन व पेडेस्ट्रियन पॉलिसी नुसार विकसन करण्याचे नियोजन आहे. त्यापैकी जंगली महाराज रस्त्याचे (२ कि.मी.लांबीचे)काम पूर्ण करण्यात आले असून, काँग्रेस भवन रस्ता, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, बिबवेवाडी रस्ता, लक्ष्मी रस्ता, इ.चे काम प्रगतीपथावर आहे.

- **बी.आर.टी.एस. प्रकल्प –** संगमवाडी ते विश्रांतवाडी व नगररस्ता या रस्त्यांवर एकुण सुमारे १६ कि.मी.लांबीकरीता बी.आर.टी.एस. योजना कार्यान्वित करण्यात आली असून सदर रस्त्यांवर बी.आर.टी. बसेसचे संचलन सुरू आहे. सिमला चौक ते राजीव गांधी पुल, औंध दरम्यान ६.३ कि.मी.लांबीच्या प्रस्तावापैकी विद्यापीठ चौक ते राजीव गांधी पुल दरम्यानचे २.२ कि.मी.लांबीचे काम प्रगती पथावर आहे. तसेच पाटील इस्टेट जंक्शन ते हॅरीस ब्रिज, बोपोडी या रस्त्यांवर सुमारे ५.७० कि.मी. लांबी पैकी पाटील इस्टेट जंक्शन ते रेंजहिल चौक दरम्यान२.०० कि.मी.लांबीच्या बी.आर.टी.योजनेचे काम सुरू आहे.

- **शिवणे ते खराडी रस्ता –** शहरातील वाहतुकीवरील ताण कमी करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून शिवणे ते खराडी दरम्यान नदीकाठावर दर्शविण्यात आलेल्या डी.पी.रस्त्याचे काम, शिवणे ते म्हात्रे पुल फेज-१ लांबी ६ कि.मी. व संगमवाडी ते खराडी फेज-३ लांबी ११.५० कि.मी. असे एकुण १७.५० कि.मी. लांबीचे काम प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत सदर रस्त्याचे सुमारे ४५% काम पूर्ण झाले आहे.

- **कात्रज-कोंढवा रस्ता–**कात्रज-कोंढवा रस्ता राजस सोसायटी ते खडीमशिन चौक दरम्यान सुमारे ३.५ कि.मी. लांबीचा व ८४ मी. रूंदीचा रस्ता विकसीत करण्याकरीता मा.स्थायी समिती मार्फत मंजूरी देण्यात आली असून या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## सन २०१९-२०चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

(भांडवलीतरतूद र.रु.५५०.३०कोटी + महसुली तरतूद र.रु.२९९ कोटी = र.रु. ८४९.३० कोटी)

- या तरतूदीमध्ये नव्याने शिवणे-खराडी रस्त्याचे कामासाठी र.रू.३१.६० कोटी, कात्रज-कोंढवा रस्त्याचे कामासाठी र.रू.४९ कोटी मोठया प्रकल्पीय कामांचा समावेश आहे.

- **सन २०१९-२० मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना –**

- **एच.सी.एम.टी.आर.प्रकल्प –** एचसीएमटीआर प्रकल्पाची एकुण लांबी सुमारे ३६ कि.मी.असून रूंदी २४ मी. आहे. सदर प्रकल्पाची प्रस्तावित अलाइन्मेन्ट पूर्णत: उन्नत स्वरूपाची असून त्यावर एकुण ६ मार्गिका प्रस्तावित आहेत. यामध्ये २ मार्गिका बीआरटीसाठी व उर्वरित मार्गिका खाजगी वाहनांसाठी आरक्षितआहेत.सदर प्रकल्पाच्या उभारणीसाठी र. रू. ५०९६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच भूसंपादनाकरीता सुमारे र.रू.१५५० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्पासाठी कॅपिटल फॉर्च्यून प्रा.लि. या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. या सल्लागाराने विहित मुदतीत म्हणजे ८ महिने कालावधीमध्ये सदर प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी विविध Financial Options देऊन प्रकल्प खर्च उभारणीची जबाबदार सोपविण्यात आलेली आहे.सदर प्रकल्पासाठी एकुण र.रू. २११ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जागेचे भूसंपादन करण्याकरिता पुणे महानगरपालिकेकरिता सन २०१७ मध्ये मान्य करण्यात आलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील Reservation Credit Bondच्या तरतूदीचा वापर करण्यात येणार आहे.

- **पुणे मनपा अंतर्गत रोड सेफ्टी अहवालानुसार रस्ते विकसन करणे–** पुणे मनपा हद्दीतील सुमारे ५०० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे रोड सेफ्टी इम्प्रुव्हमेंट प्लॅनचा सर्व्हे करण्यात आला असून त्यापैकी सुमारे १०० कि.मी.लांबीच्या रस्त्यांचे प्रकल्पातील अहवालानुसार सुधारणा करण्याचे नवीन आर्थिक वर्षामध्ये नियोजन आहे. जेणेकरून नागरिकांना सुरक्षित रस्ते उपलब्ध होतील.
- **पुणे मनपा हद्दीतील रस्त्यांचे रोड ॲसेट मॅनेजमेंट सिस्टीम प्रकल्प अहवालानुसार रस्ते सुधारणा करणे–** सदर प्रकल्पांतर्गत पुणे मनपा हद्दीतील ६ मी. रूंदी व त्यावरील रूंदीच्या रस्त्यांचे सर्व्हे करण्यात आले आहेत. सदर सर्व्हेमध्ये रस्त्यावरील सर्व घटक (वाहतूकीसाठी उपलब्ध रस्ता,फूटपाथ,डिव्हाईडर, स्ट्रीट लाईट, ट्रॅफिक साईन, पावसाळी लाईनइ.) यांची माहिती उपलब्ध आहे. तसेच सद्य:स्थितीत डांबरी अथवा काँक्रिट रस्त्यांना ज्या ठिकाणी दुरूस्तीची गरज आहे त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार या आर्थिक वर्षात तरतूद सुचविण्यात आली आहे.
- पुणे महानगरपालिके मार्फत आतापर्यंत एकु ण सुमारे १४०० कि.मी. लांबीचे रस्ते विकसीत करण्यात आले असून, यामध्ये ६ मी. ते ८४ मी. रूंदीच्या रस्त्यांचा समावेश आहे. तसेच पुणे शहराच्या विकास आराखडयामध्ये दर्शविण्यात आलेल्या रस्त्यांचे भूसंपादन करून रस्ते विकसीत करण्याचे नियोजन महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेले आहे.

## (८) <u>पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.(र. रू.२७३.०४कोटी)</u>

### सन २०१८–१९

- महिलांकरिता तेजस्विनी बस सेवा सुरू करण्यात आली आहे. त्याकरिता ३३ बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
- सन २०१८–१९ मध्ये स्वमालकीचे १४१९ व खाजगी ६५३ सह एकूण २०७२ बस ताफा आहे. त्यापैकी १३८४ बसेस मार्गावर उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
- सन २०१८–१९

| | |
|---|---|
| अपेक्षित उत्पन्न र.रू. | :– ६२१.२५ कोटी |
| अपेक्षित खर्च र.रू. | :– ८६५.८० कोटी |
| तूट र.रू. | :– २४४.५५ कोटी |

### सन २०१९–२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- पुणे महानगर परिवहन महामंडळाने ४०० नवीन स्वमालकीच्या एसी सीएनजी बसेस घेण्याबाबत कार्यवाही सुरू केली असूनलवकरच बसेस दाखल होत आहेत.
- ५०० ई–बसेस टप्याटप्याने व Gross Cost Contractतत्वावर ४४० सी.एन.जी. एसी बसेस घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
- सद्यस्थितीला पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या एकूण १४१९ स्वमालकीच्या बसेस असून त्यातून ३०० बसेस ताफ्यातुन बाद होणार आहेत. त्यामुळे१११९एवढा बसेसचा ताफा राहणार असून पुढील वर्षी त्यामध्ये १३४० बसेसने वाढ होणार आहे.
- सन २०१९–२० मध्ये सद्याच्या ६५३ खाजगी बसेससह एकुण ३४१२ बस ताफ्यात राहणार असून ३०२५ बसेस मार्गावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

- सन २०१९-२० च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात र. रू.३७५.५१ कोटीची तरतूदकरण्यात आली आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कमरू.(कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | इ.५वी ते १० वी पर्यंतचे विद्यार्थ्यांना मोफत पासेस / बससेवा | ७.७८ |
| २ | नागरवस्ती विकास योजना, अंध/अपंग पासेस | ९.०० |
| ३ | विविध सवलतीचे पासेस | २७.०० |
| ४ | मा.नगरविकास विभाग शा.नि.क्र.एनयुआर-२०१३/प्र.क्र.३३८/नवि-३३, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि.१८/०२/२०१४ नुसार संचलन तूट | १४६.७३ |
| ५ | ८०० बसेस खरेदी प्रक्रियेसाठी उर्वरित रक्कम | ७५.०० |
| ६ | इलेक्ट्रॉनिक बसेस - (जीसीसी मॉडेल) विकत / पीपीपी धर्तीवर उपलब्ध करणे. | १०५.०० |
| ७ | डेपो डेव्हलपमेंटसाठी | ५.०० |
| | **एकुण** | **३७५.५१** |

## (९) <u>नदीसुधारणा प्रकल्प(र.रु.८०.२७कोटी)</u>

### सन २०१८-१९

- **नदीकाठ सुधारणा प्रकल्प राबविणे-** पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड या भागांच्या हद्दीतून वाहणाऱ्या अंदाजे ४४ कि.मी. लांबीच्या मुळा, मुठा, मुळा-मुठा नदीकाठ सुशोभिकरण व विकसनाबाबत नद्यांचे जलशास्त्रीय सर्वेक्षण करणे, डिझाईन नकाशे तयार करणे, डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे, तसेच संबंधित सर्व शासकीय व निमशासकीय विभागाकडील मान्यता घेणे इ. स्वरुपाची कामे करण्यासाठी तज्ञ सल्लागार मे. एच.सी.पी.डिझाईन प्लॅनिंग ॲन्ड मॅनेजमेंट प्रा.लि., अहमदाबाद यांची नेमणूक करणेत आलेली आहे. नदीची जागा ही महसुल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय यांचे कार्यकक्षेत येत असून नदीची हद्द निश्चित करणेसाठी नदी काठी असलेल्या मिळकतींची मोजणी भूमी अभिलेख विभागामार्फत सन २०१७-१८ मध्ये करण्यात आली आहे. तसेच पाणी विषयक संशोधन व कॉम्प्युटर मॉडेलिंग यावर अभ्यास करणारी केंद्र शासनाशी खडकवासला येथे CWPRS ही संस्था आहे. तज्ञ सल्लागार यांचेकडून करण्यात आलेल्या हायड्रॉलॉजी हायड्रोलिक्स रिपोर्ट CWPRS,खडकवासला, पुणे यांचेमार्फत तपासून घेणेत आलेला आहे. तसेच पाऊस व पुरपरस्थितीच्या अनुषंगाने नदीच्या वहनाबाबतचे तांत्रिक अधिकार महाराष्ट्र शासन,पाटबंधारे विभाग यांचे कार्यकक्षेत येत असून यासाठी त्यांचेकडून ना हरकत प्राप्त करून घेण्यात येत आहे. नदीच्या पाण्याच्या प्रदुषणाबाबत मार्गदर्शक तत्वे, मानके हे केंद्रीय प्रदुषण मंडळाकडून देण्यात येतात. यासाठी त्यांचेकडेTOR सादर केलेला आहे. उपरोक्त संस्था मिळुन SPV स्थापन केल्यास नदीकाठ विकसन प्रकल्प राबविणे सुलभ होणार आहेत.SPVस्थापन करण्याविषयी मा. प्रधान सचिव (नवि-२), महाराष्ट्र शासन यांचेकडे दि. २१.३.२०१८ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. नदीकाठ विकसन प्रकल्पाच्या प्रारूप आराखडयास मा.मुख्य सभेची ठ.क्र २०९७ दि.१२.०२.२०१८ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

- **सन २०१९-२० – नदीकाठ विकसन प्रकल्प**
- नदीकाठ विकसन प्रकल्पासाठी सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात या कामाकरिता र. रू. १०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे .या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे कामे करण्यात येणार आहेत.

१.महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे.
२.अंतिम प्रकल्प अहवाल तयार करणे.
३.नदीशी संलग्न असलेल्या विविध विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे.
४.वरील संस्था मिळुन एस.पी.व्ही.कंपनी स्थापन करणे.

## (१०) उद्यान(भांडवली तरतूद र. रु.९७.१२ कोटी + महसूली तरतूद र.रु. ४३.७२ कोटी =र.रु.१४०.८४ कोटी)

**सन २०१८-१९**

- **पु.ल.देशपांडे उद्यान, सिंहगड रोड येथेकलाग्राम विकसीत करणे –**

पु.ल.देशपांडे उद्यान, सिंहगड रोड फेज-३ येथे दिल्ली हटच्या धर्तीवर कलाग्राम विकसीत करणेत येत आहे. विविध राज्यामधील कलाकारांना त्यांची कला सादर करणे व त्यांच्या वस्तुचे प्रदर्शन व विक्री करणे या संकल्पनेवर आधारित कलाग्राम विकसीत करणेत येणार आहे. पहिल्या टप्प्यांमध्ये २८ कलाकारांनी तयार केलेल्या कलाकृती विक्रीसाठी दालने बांधण्याचे नियोजन आहे. पुढील टप्प्यामध्ये २०० नागरिक बसु शकतील इतक्या क्षमतेची आसन व्यवस्था तसेच अल्पोपहार केंद्र उभारण्यात येत आहे.

- **तळजाई टेकडी येथील नियोजित जैवविविधता उद्यानविकसीत करणे –**

सुमारे ११०एकर क्षेत्रावर आणि महापालिकेच्या ताब्यात असलेल्या डोंगरमाथा, डोंगर उताराच्या जागेवर जैवविविधता उद्यान साकारले जाणार आहे. प्रकल्पाच्या क्षेत्रात वाहनांचा वापर टाळण्यासाठी स्वतंत्र वाहनतळ असणार आहे. वीज निर्मितीकरीता वाहनतळावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारणेत येत आहे. नक्षत्र उद्यान, बांबु उद्यान, रानमेवा उद्यान, मसाल्याच्या वनस्पतीचे उद्यान, वनऔषधी उद्यान, पुष्प उद्यान आणि सुगंधी वनस्पतीचे उक्षन, डिअर पार्क इ. प्रकारच्या संकल्पनेवर आधारीत उद्याने विकसीत करण्यात येणार आहेत. व्यायाम आणि चालण्यासाठी येणाऱ्या नागरिकांकरीता जॉगींग ट्रॅक तयार करण्यात येणार आहे. मोठ्याप्रमाणात स्थानिक जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात येत आहे. प्रथमत: पहिल्या भागामध्ये जैववैविध्य उद्यान व क्रिकेटचे मैदान विकसीत केलेले आहे. सदरहू उद्यान व क्रिकेट मैदान याचे क्षेत्रफळ सुमारे ७ एकर एवढे असून यामध्ये १ मुख्य खेळपट्टी व ६ सरावखेळपट्ट्या अशा एकुण ७ खेळपट्टयांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच हिरवळ, झाडे-झुडपे इत्यादीसाठी लागणारे पाणी हे अंबिल ओढा नाल्यातील पाण्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रीया करुन (Grey Water) या उद्यानाला पाणी पुरवठा केलेला आहे.

- **स्व.राजीव गांधी प्राणी संग्रहालय –**

स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय, कात्रज येथे हत्तीसाठी पोहण्याचा तलाव तसेच विविध प्राण्यांसाठी खंदक बांधण्यात येत असुन,काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. लहान मुले व नागरिकांना तलाव पाहणे हे उद्यानाचे प्रमुख आकर्षण होणार आहे.

- **गुलटेकडी फा. प्लॉट नं ४३८ पुनावाला गार्डन शेजारील नियोजीत उद्यान –**

  पुणे शहरात प्रथमच टोपीअरी प्रकारात प्राण्यांच्या कलाकृतीचे उद्यान साकारण्यात येत आहे. सन २०१८–१९ अखेरीस काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

  सुगम्य भारत योजने अंतर्गत शहरातील विविध उद्यानामध्ये दिव्यांग व्यक्तिकरिता स्वच्छतागृह बांधणे व इतर सोयीसुविधा निर्माण करणेचे काम सुरु आहे.

  कात्रज तलाव, पाटील वाडा व गार्डन सुशोभित करणे व थीम पार्क विकसीत करणेचे काम पूर्णत्वास आहे.

**सन २०१९–२०चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- **तुकाई माता उद्यान, हिंगणे खुर्द येथे लिली पार्क तयार करणेचे नियोजन आहे –**

  सिंहगड रोडवर पाटबंधारे खात्याच्या जागेवर सुमारे ४ एकर क्षेत्रावरती लिली पार्क विकसीत करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने देश–विदेशातील ५० ते ६० प्रकारच्या लिली वर्गीय प्रजातींचा समावेश आहे. तसेच या उद्यानामध्ये लिली या झाडाबरोबर इतरही सुगंधित झाडे, झुडपे, वेली या वर्गातील वनस्पतींचा समावेश असणार आहे.

- **तुकाई माता उद्यान, हिंगणे खु. येथे रॉक गार्डन तयार करणेचे नियोजन आहे –**

  सिंहगड रोडवर पाटबंधारे विभागाच्या सात एकर जागेवर रॉक गार्डन करण्याचे नियोजन असुन, रॉक गार्डनची थीम संकल्पना राबवताना सिमेंटीकरण करुन उद्यानातील जॉगींग ट्रॅकच्या बाजूने दगडी कर्व्हस्टोन बसवुन ट्रॅकवरती दगडाचे ब्लॉक बसविण्यात येणार आहे. उद्यानामध्ये दगडी दिवे, दगडाचे बाके (विविध पद्धतीचे आकार देऊन) तसेच विविध राज्यातील दगड वापरुन दगडांमध्ये खेळणी तयार करण्यात येणार आहे. सदरहू उद्यानामध्ये ओपन ॲम्पी थिएटरचा समावेश आहे. सदरहू रॉक गार्डनमध्ये विविध राज्यातील दगडांवर कलात्मकपद्धतीने विविध शिल्पांची कलात्मक मांडणी करण्यात येणार आहे.

- **स. न. ५५, वडगाव शेरी येथे “Barrier Free Access”**या संकल्पनेवर आधारित दिव्यांगाकरिता अडथळा विरहीत उद्यान विकसीत करण्याचे नियोजन आहे.

- **कै.बाळासाहेब ठाकरे उद्यान डहाणुकर कॉलनी,** कोथरुड येथे “Talking Trees” या संकल्पनेवर आधारित उद्यान विकसित करण्याचे नियोजन आहे. यामध्ये दृक्‌श्राव्य माध्यमातून झाडे स्वतःविषयी माहिती देणार आहेत.

## (११) विद्युत(भांडवली तरतूद र. रु.१०६.३८ कोटी + महसूली तरतूद र.रु. २२२.९९ कोटी =र.रु. ३२९.३७ कोटी)

**सन २०१८–१९**

**सन २०१८–१९ मध्ये विद्युत विभागातर्फे खाली नमूद केल्याप्रमाणे महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.**

- ऊर्जा बचतीसाठी व पथ दिव्यांसाठी दैनंदिन देखभाल दुरूस्तीवर होणाऱ्या खर्चामध्ये बचत होण्याच्या दृष्टीने शहरामध्येएस्को(Energy Services Company) तत्वावर एल.ई.डी दिवे बसविण्याचे काम सुरू असून माहेडिसेंबर २०१८ अखेर शहरातील विविध रस्त्यांवर टाटा प्रो. व्दारे ८५३८५ एल.ई.डी दिवे बसविण्यात आले आहेत. माहे नोव्हेंबर २०१८ अखेर ३,९३,५९,९६२ कोटी युनिटऊर्जेची बचत झालेले असुन १२ वर्षे त्यांचेकडून देखभाल व दुरूस्ती करून घेण्यात येणार आहे.

- हा प्रकल्प सार्वजनिक खाजगी भागिदारी (PPP) पध्दतीने कोणत्याही Capex गुंतवणुकीशिवाय पुणे शहरातील नागरिकांवर कोणताही जास्तीचा आर्थिक भार न टाकता कार्यान्वित केला जात आहे. नियत्रंण आणि व्यवस्थापन केंद्र पुढील कामे करीत आहे.प्रकाशाच्या तीव्रतेचे केंद्रभूत व्यवस्थापन आणि नियत्रंण, दिव्याचे रिमोट पध्दतीने प्रभावी संचलन, दोषाची माहिती देणे आणि कार्यवाही वर देखरेख ठेवण्यात येत आहे या प्रकल्पाव्दारे नागरीकांसाठी असलेल्या मोबाईल अॅप आणि मोफत दूरध्वनी क्रमांकाच्या माध्यमातून तक्रारींची दखल घेऊन त्यांचे निराकरण प्रभावीरित्या केले जात आहे.

- शहरामधील विविध रस्त्यावरील पथ दिवे नियत्रंण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानानुसार मध्यवर्ती नियत्रंण कक्ष सिंहगड रस्ता विद्युत भवन या ठिकाणी उभारण्यात आला आहे. सदर नियत्रंण कक्षामध्ये बंद दिव्याबाबतची माहिती स्काडा तंत्रज्ञानाव्दारे उपलब्ध होत आहे.

- पुणे शहरामधील एकुण २१ ठिकाणच्या स्मशान भूमीत पर्यावरणपूरक एअर पोल्युशन यंत्रणा बसविली आहे.

- जिल्हा नियोजन समितीमार्फत नाविन्यपूर्ण योजनेच्या निधीतुन पुणे मनपा अंतर्गत पुणे शहरातील लहान व मोठया मृत प्राण्यांची शास्त्रीयदृष्टया विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने इन्सिनरेटरची उभारणी डॉ. नायडू हॉस्पीटल लगत करण्यात आली आहे.

- पुणे महानगरपालिकेच्या ९ इमारतींवर रूफ टॉप सोलर सिस्टिम रेस्को मॉडेल द्वारा ४३३ किलो वॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात आला असून ३४ इमारतींवर रूफ टॉप सोलर सिस्टिम कॅपेक्स मॉडेल द्वारा ८२५ किलो वॅट असे एकुण १.२५ MW क्षमतेचा प्रकल्प उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

- जिल्हा नियोजन समितीमार्फत नाविन्यपूर्ण योजनेच्या निधीतुन शहरातील नदीवरील पुलांवर नवीन आर्किटेक्चरल प्रकाश व्यवस्था व सुशोभिकरण करण्याचे काम प्रगती पथावर आहेत.

- शहराच्या नावलौकिकात भर घालण्यासाठी पुणे मनपाच्या विस्तारीत इमारतीमध्ये अद्ययावत प्रकाश व्यवस्था व अत्याधुनिक पध्दतीची डिजिटल कॉन्फरन्स सिस्टिम बसविण्यात आली आहे.

- तळजाई जॉगिंग ट्रॅक या ठिकाणी डेकोरेटीव्हपोल बसवून अद्ययावत प्रकाश व्यवस्था केली आहे.

## सन २०१९–२०चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- केंद्र शासनाच्या धोरणानुसार EESL (Energy Efficiency Services Ltd.) शहरातील प्रकाशव्यवस्थेमध्ये उर्वरित एलईडी दिवे बसविण्यासाठी र.रू ९कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

- मनपा मुख्य इमारतीमध्ये वीजबचत करण्याच्या उद्देशाने एनर्जी सेव्हिंग कंट्रोल पॅनेल व एलईडी दिवे बसविण्याचे नियोजन करण्यात आले असुन यासाठी र.रू ०.४ कोटी इतकी तरतूदकरण्यात आली आहे.

- पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गांवामध्ये प्रकाशव्यवस्था करण्यासाठी र.रू.२.१० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

## (१२) अमृत अभियान व स्मार्ट सिटी, जनेराशपुअवाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्प

### सन २०१८-१९

- अमृत अभियान व स्मार्ट सिटी, जनेराशपुअवाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्प, बीएसयुपी या योजने अंतर्गत करावयाच्या कामांसाठी सन २०१८-१९ करिताएकुण निधी र.रू.१५४.८८ कोटी मंजूर आहे.
- जनेराशपुअवाढीव कालावधी मध्ये मंजूर झालेले तसेच अमृत अभियानांमध्ये समावेश झालेल्या भामा आसखेड पाणी पुरवठा योजनेसाठीची तरतूद र.रू.८७ कोटी व वडगाव बुद्रुक प्रकल्पांसाठी र.रू.३.६५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त बीएसयूपी या योजने अंतर्गत र.रू.९.४९ कोटी तरतूद केली आहे.
- अमृत अभियान अंतर्गत सुरू असलेल्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पांसाठी र.रू.२.५५ कोटी तरतूद करण्यात आली आहे व पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४X७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे पाणी पुरवठा विभागाच्या अंदाजपत्रक 'क' येथे समावेश करण्यात आली आहे.
- स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांसाठी र.रू.५०.०० कोटी मनपा सम हिश्याची तरतूद अनुदान म्हणून करण्यात आली आहे.

### सन २०१८-१९ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/प्रकल्प

- ज.ने.रा.श.पु.अ.अंतर्गत वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्पातील भामा आसखेड या प्रकल्पाचे काम पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यावर आहे.
- अमृत अभियान अंतर्गत पुणे हरित क्षेत्र विकास प्रकल्प २०१५-१६ (प्रकल्पीय रक्कम रु.१ कोटी) चा दुसरा हप्ता प्राप्त झाला आहे.
- तसेच अमृत अभियानांतर्गत प्रोत्साहन निधी म्हणून रिफॉर्मस (२०१६-१७) साठी र.रु.३६.४४ लाख प्राप्त झालेले आहेत.
- अमृत अभियान अंतर्गत म्युन्सिपल बाँड प्रोत्साहन निधी र.रु.२६.०० कोटी प्राप्त झालेले आहेत.
- पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४X ७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे (प्रकल्पीय सुधारित र.रु.२४५.२४ कोटी) या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

### सन २०१९-२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- अमृत अभियान व स्मार्ट सिटी, ज.ने.रा.श.पु.अ.वाढीव कालावधीमधील प्रकल्प, बीएसयुपी या योजने अंतर्गत करावयाच्या कामांसाठी सन २०१९-२० साठी आवश्यकतरतूद र.रु.१६८.८८ कोटी प्रस्तावित आहे. या व्यतिरिक्त पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४X७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणेसाठी पाणी पुरवठा विभागाच्या अंदाजपत्रक 'क'अंतर्गत र.रु.९० कोटी इतकी तरतूद विभागाद्वारे करण्यात आली आहे.
- अमृत अभियानांतर्गत पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा (२४X७) योजनेसाठी केंद्र शासनाचा ३३%, राज्य शासनाचा १७% व महानगरपालिकेचा ५०% इतका वाटा असणार आहे. तसेच हरित क्षेत्र विकास प्रकल्पांसाठी केंद्र शासनाचा ५०%,राज्य शासनाचा २५% व महानगरपालिकेचा २५% इतका वाटा आहे.
- स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत मनपाचा हिस्सा र.रु.५० कोटी इतकी तरतूद अनुदान म्हणुन प्रस्तावित आहे.

**सन २०१९-२० मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना-**

- अमृत अभियान अंतर्गत पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४X ७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधून प्रकल्प पूर्ण करण्याचे उदिष्ट आहे.
- अमृत अभियान अंतर्गत स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज प्रकल्प मंजूरी होण्याचे प्रस्तावित आहे.

## (१३) भवन रचना(भांडवली तरतूद र. रु.३६३.०२ कोटी + महसूली तरतूद र.रु. ४०.४८ कोटी =र.रु. ४०३.५० कोटी)

**सन २०१८-१९**

- **सन २०१८-१९ मधील महत्वाच्या पूर्णत्वास / सुरू असलेल्या नाविण्यपुर्ण प्रकल्प**
- मनपा भवन येथील विस्तारीत इमारतीचे काम पूर्ण करणेत आलेले आहे.
- पुणे शहरात महात्मा फुले पेठ, सावित्रीबाई फुले स्मारक येथे लाईट हाऊस प्रकल्प कार्यान्वित करणेत आलेला आहे.
- नायडु हॉस्पिटलच्या आवारातील रेकॉर्ड रूमचे बहुमजली इमारतीचे काम पूर्ण करणेत आलेले आहे.
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय लक्ष्मीनगर येथील नवीन इमारतीचे काम पूर्ण करणेत येत आहे.
- सिंहगड रोड वडगाव बुद्रुक येथे श्री छत्रपती शिवाजीराजे भोसले सांस्कृतिक भवन व कला मंदीर बांधणेत येत आहे.
- गणेशपेठ मासळी मार्केटचे नूतनीकरणाचे काम पूर्णकरण्यात येत आहे.
- गणेश पेठ येथील दुधभट्टी बांधणेचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- कोथरूड येथे बाळासाहेब ठाकरेकलामंदीराचे काम पूर्ण करणेत येत आहे.
- वारजे येथे मॅटर्निटी होम बांधणेत येत आहे.
- कर्वेनगर येथे ई-लर्निंग स्कूल इमारतीचे तळमजल्यावर १९ वर्गखोल्या बांधणेत येत आहेत.

**सन २०१९-२०चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- पुणे मनपा मुख्य इमारतीमध्ये पूर्व बाजुस तिसऱ्या मजल्यावर कमांड कंट्रोल सेंटरची उभारणी करणेत येणार आहे.
- शिवाजीनगर येथे डॉ.होमी भाभा हॉस्पिटल पाडुन नव्याने विकसीत करणेत येणार आहे.
- बावधन येथे नवीन फायर स्टेशन व ट्रेनिंग सेंटर उभारण्यात येणार आहे.
- हडपसर येथील फायर स्टेशनचे काम पूर्ण करणेत येणार आहे.
- सिंहगड किल्ल्यावरील स्वराज्यनिष्ठ शिल्पाची उभारणीचे कामे करणेत येणार आहेत.
- बाणेर येथे आर.के.लक्ष्मण यांच्या नावाने कलादालन उभारणेत येणार आहे.
- येरवडा येथील रामभाऊ मोझे शाळेची धोकादायक इमारत पाडून नव्याने बांधण्याचे नियोजन आहे.

### सन २०१९-२० मधील प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना

- कोथरूड येथे एक्झिबिशन सेंटरची उभारणी करणेत येणार आहे.
- हडपसर येथे राजर्षी शाहु संकुलामधील कै.विठ्ठलराव तुपे नाटयगृहाचे काम पूर्ण करणेत येणार आहे.
- नगर रोड येथील क्षेत्रिय कार्यालयाची इमारत पूर्ण करणेत येणार आहे.
- वानवडी येथील महादजी शिंदे शाळा जुनी इमारत पाडुन ई -लर्निंग शाळा बांधुन पूर्ण होणार आहे.
- नायडु कोठीच्या आवारात भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालय उभारणेत येणार आहे.

## (१४) माहिती व तंत्रज्ञान(र. रू.३८.१८कोटी)

### सन २०१८-१९

- **PMC CARE 2.0**–पुणे महानगरपालिकेमार्फत नागरिकांच्या सोयीसाठीPMC CARE (Citizen Assistance Response Engagement) हा प्रकल्पकार्यान्वित करण्यात आलाआहे. पुणे महानगरपालिकेला विविध माध्यामातून एकुण ६०,०८० तक्रारी प्राप्त झाल्याअसून ५८,६९२ तक्रारी निरस्त करण्यात आल्या आहेत. सरासरी एकुण ९७%तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.
- **सोशल माध्यमांचा प्रभावी वापर**- पुणे महानगरपालिकेच्या विविध सेवा, योजना, सूचनांबाबत नागरिकांपर्यंत वेगाने आणि अचूकपणाने माहिती पोहोचावी यासाठी फेसबुक, ट्विटर, व्हॉटसअॅप, युट्युब आदी माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. या माध्यमांचा नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद प्राप्त होत आहे.
- **संकेतस्थळ**–अत्याधुनिक्तंत्रज्ञानाचा वापर करुन विकसीत करण्यात आलेल्या पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर सर्व विभागांची अद्ययावत माहिती उपलब्धकरुन देण्यात आली आहे. सदर संकेतस्थळांस आत्तापर्यंत एकुण ३,३४,२१,४५५ Hits प्राप्त झाल्या आहेत.
- **डीबीटी** –पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभधारकांना मिळणारा लाभ थेट बँकेत जमा करण्यासाठी लाभाचे थेट हस्तांतरण (Direct Benefit Transfer) प्रणाली विकसीत करुन त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.सदर प्रणालीद्वारे नागरिकांना विविध योजनांतर्गत र. रु. ४८.४७ कोटी, मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना र. रु. ३५.१३ कोटीव पुणे मनपाच्या सेवकांना र. रु. ६.६२ कोटी असे विविध योजनांकरिता Direct Benefit Transferच्यामाध्यमातून थेट बँकेत जमा करण्यात आले आहे. याकरिता Centralised DBT संगणकप्रणाली विकसीत करण्यात येऊन त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे.
- **OPEN DATA** -पुणेकर नागरिक, शास्त्रज्ञ, विविध संस्था, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ, इंजिनिअर्स यांना शहरातील विविध शासकीय विभागांची तपशीलवार माहिती Open Governanceचे माध्यमातून उपलब्ध होणेकरिता आंतरराष्ट्रीय स्तरानुसार ओपन डेटा पोर्टल (opendata.punecorporation.org) विकसीतकरण्यात आले आहे. सदर पोर्टलद्वारे मनपातील विविध विभागांची अधिकाधिक माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- **नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर**– पुणे महानगरपालिकेची मुख्य इमारत, विविध क्षेत्रिय कार्यालयातील नेटवर्कचे अपग्रेडेशन काम चालू असून सर्व कार्यालयांमधील Network Infrastructure अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत अद्ययावत करण्यात येत आहे. पुणे महानगरपालिकेतील मुख्य भवन लिज लाईन १०० एमबीपीएस व सर्व क्षेत्रिय कार्यालये १० एमबीपीएसने अद्ययावतीकरण करण्यात आले आहे.

- **लाईट हाऊस प्रकल्प –**नागरिकांना संगणकीय दृष्टया साक्षर करण्यासाठी डिजीटल लिट्रसी सेंटर्स उभारण्यात आलेले आहेत. त्यामध्ये २ लाईट हाऊसप्रकल्पभवानी पेठ व वारजे याठीकाणी कार्यान्वितकरण्यात आले आहे.
- **लक्ष्य प्रकल्प**– केंद्र सरकारचा स्वच्छ सर्वेक्षण उपक्रम पुणे शहरात कार्यान्वित आहे. या उपक्रमांतर्गत स्वच्छतेविषयी प्रभागनिहाय सर्व्हेद्वारे स्वच्छतेबाबतची सद्यस्थितीतील माहिती संकलित करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने लक्ष्य उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत मोबाईल ॲप विकसीत करण्यात आला आहे. पुणे महानगरपालिकेचे अधिकारी दररोज प्रभागात जाऊन तेथील स्वच्छते विषयीची माहिती संकलीत करतात.

## सन २०१९–२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- पुणे महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने सन २०१९–२० या वर्षातील प्रस्तावित कामे खालीलप्रमाणे :
- पुणे महानगरपातील विविध खात्यांमधील Digitizationचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढत असल्याने मनपातीलमाहीती व तंत्रज्ञान विभागाचे बळकटीकरण करणे प्रस्तावित आहे.
- **डॅशबोर्ड –** पुणे महानगरपालिकेच्या सर्व विभागांची माहिती अद्यावत ऑनलाईन डॅशबोर्डच्या माध्यमातून विकसीत करुन त्याबाबत Centralised Platform कार्यान्वित करुन सर्व संगणकप्रणाली इंटीग्रेट करणे प्रस्तावित आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या DashboardचेPlatformsचे नुतनीकरण व अद्ययावतीकरणकरणे प्रस्तावित आहे.
- **नगरसचिव विभाग दस्तावेज स्कॅनिंग –** पुणे महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागाकडील सन १९५० पासूनचे सर्व जुने व महत्वाचे दस्त, नस्ती, नोंदी, अभिलेख, विविध समिती निर्णय इत्यादी महत्वाचे रेकॉर्ड स्कॅनिंग करून डिजिटल स्वरुपात जतन करणे व भविष्यातील गरजेप्रमाणे त्याचा वापर करणे प्रस्तावीत आहे.
- **हार्डवेअर इन्फ्रास्ट्रक्चर अद्यावतीकरण –** Hardware Infrastructure अत्याधुनिकतंत्रज्ञानावर आधारित संगणकीय साहित्यांचा वापर करणे प्रस्तावित आहे.
- मुख्य लेखापाल विभागकडील संगणकप्रणाली अद्यावतीकरण करुन कार्यान्वित करुन अंमलबजावणी करणे.
- **Enterprise Resource Planning (ERP)** -पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांकडील संगणकप्रणाली मुख्य लेखा व वित्त विभागाकडील संगणकप्रणालीशी जोडणे करिता वपुणे मनपाच्याविविध विभागांकडील होणाऱ्या आर्थिकव्यवहारांची माहिती एकत्रितरित्या संकलित व सुरक्षित ठेवण्यासाठी Enterprise Resource Planning (ERP)प्रकल्प कार्यान्वित आहे. सद्यस्थितीत विविध विभागांच्या गरजेनुसार संगणक प्रणाली विकसीत करण्यात आली असुन, सदर प्रणालीचे संबंधीत विभागास प्रशिक्षण देणे व तपासणीचे कामकाज प्रस्तावित आहे.

## (१५) <u>हेरिटेज सेल</u>

**सन २०१८–१९**

- लालमहाल येथील मास्टर प्लॅनिंगनुसार विविध विकास व दुरूस्तीची कामे चालू आहेत.
- ऐतिहासिक जुनी महात्मा फुले मंडई येथे दुरूस्ती कामे चालू आहेत.
- पुणे टुरिस्ट डेस्टिनेशन करीता टुरिझम मास्टर प्लॅन तयार करणे व त्या अनुषंगाने विकास कामे करणे याअंतर्गत मास्टर प्लॅन तयार करण्यात आलेला आहे.
- पुणे शहरातील हेरिटेज स्ट्रक्चरबाबत सुरक्षा व स्वच्छताविषयक कामे करणेया कामाची निविदा मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

**सन २०१८–१९ मधील महत्वाच्या पुर्णत्वास/सुरू असलेले नाविण्यपुर्ण प्रकल्प**

- नानावाडा या ऐतिहासिक वास्तुमधील दरबार हॉल व दर्शनी वास्तु याचे जतन संवर्धनाचे काम पूर्णत्वास आले असुन, नानावाडा या दगडी इमारतीच्या दालनामध्ये आद्य सशस्त्र क्रांतीकारकांच्या जीवनचरित्रावर आधारीत कायमस्वरूपी संग्रहालय उभारण्याचे फेज–१(७ दालने) काम पूर्ण करणेत आले आहे.
- विश्रामबागवाडा या ऐतिहासिक वास्तुच्या पहिल्या चौकातील दर्शनी बाजुची छतावरील गळतीची कामे,जतन संवर्धनाची कामे करण्यात आली आहेत.(पुनवडी ते पुण्यनगरी बाजु)
- सिंहगडकिल्ला येथे स्वराज्यनिष्ठ शिल्प व मेघडंबरी उभारणे, हे काम पुर्णत्वास आलेले आहे.

**सन २०१९–२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- नानावाडा येथील पेशवेकालीन व दगडी इमारतीची उर्वरीत टप्प्यातील जतन संवर्धनाची कामे करण्यात येणार आहेत.
- विश्रामबागवाडा येथील तिसऱ्या टप्प्यातील जतन संवर्धनाची कामे करण्यात येणार आहे.
- महात्मा फुले मंडई येथील जतन संवर्धनाची कामे करण्यात येणार आहे.
- पुणे शहरात विविध प्रकारचे हेरीटेज वॉक,मिनी बस टूर विकसीत करण्यात येणार आहेत.

**सन २०१९–२० मधील प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना.**

- विश्रामबागवाडा येथील धोकादायक वास्तुची जतन संवर्धनाची कामे करणे व पुनवडी ते पुण्यनगरी या प्रदर्शनाचे नुतनीकरण करणे.
- नानावाडा येथील पेशवेकालीन दरबार हॉल येथे नाना फडणवीस यांच्या जीवनावर आधारीत प्रदर्शन उभारणे.
- नानावाडा येथील पेशवेकालीन वास्तुची सागवानी फॉल्स सिलींग,वॉल पेंटिग जतन संवर्धन व तदनुषंगिक कामे करणे.
- नानावाडा येथे आद्य सशस्त्र क्रांतीकारकांच्या जीवनचरित्रावर आधारीत कायमस्वरूपी संग्रहालय उभारणे.
- सिंहगडकिल्ला येथे छत्रपती राजाराम महाराज यांचे समाधीचे नुतनीकरणाचे काम करण्यात येणार आहे.
- कोथरूड येथे शिवसृष्टी उभारणेसाठी प्राधान्य व गती देण्यात येणार आहे.

## (१६) शिक्षणासाठी आधुनिक सुविधा
## (प्राथमिक र. रू.३२९.२०कोटी, माध्यमिक शिक्षण र. रू.५५.०९कोटी)

### सन २०१८-१९

- प्राथमिक शिक्षण विभागाकडील सुमारे ९१,७०० विद्यार्थी/आई वडिलांच्या बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजने अंतर्गत गणवेश, स्वेटर, दप्तरे, बुटमोजे, वह्या, पाट्या, चित्रकला साहित्य, क्रिडानिकेतन शाळांमधील साहित्य इत्यादीचे पैसे र. रु. १६.८८ कोटी जमा करण्यात आले आहेत.
- बीएसएनएल मार्फत राबविण्यात येत असलेल्या ई-लर्निंग प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून, त्यामध्ये प्राथमिक शिक्षण विभागाच्या मध्यवर्ती कार्यालयात एक व्हर्च्युअल स्टुडिओ, ५० इमारतींमधून ५० व्हर्च्युअल क्लासरुम्स् व ३०० डिजिटल क्लासरुमचे काम पूर्ण करण्यात आले आहे. यामध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण व अभ्यासक्रमाधारित संगणक प्रणाली विकसीत करण्यात आली असून, त्याचा प्रत्यक्षात उपयोग करण्यात येत आहे. उर्वरित शाळांमधून प्रकल्प कार्यान्वीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
- प्राथमिक शिक्षण विभागामार्फत विविध प्रकारच्या क्रीडा व कला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्यामध्ये जिल्हास्तर क्रीडा स्पर्धा, अंतिम लोकनृत्य स्पर्धा, आंतरशालेय क्रीडा स्पर्धा, विभागीय क्रीडा स्पर्धा, समुहगीत स्पर्धा, रंगभरण स्पर्धा इत्यादींचा समावेश आहे.
- प्रशासकीय सुधारणा म्हणुन प्राथमिक शिक्षण विभागाकडील ४५०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे दरमहाचे वेतन पुणे महानगरपालिकेने विकसीत केलेल्या संगणक प्रणालीद्वारे करण्यात येत आहे.
- शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिकेकडील प्रशासकीय अधिकारी, उप प्रशासकीय अधिकारी, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी (एकुण संख्या १६) यांनी दि.२० व २१ डिसेंबर २०१९ रोजी दिल्ली येथील शाळा व शासकीय कार्यालय यांना भेट देवून शालेय गुणवत्तेबाबत माहिती घेतली.

### सन २०१९-२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- बीएसएनएल मार्फत राबविण्यात येत असलेल्या ई-लर्निंग प्रकल्पांतर्गत दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्राथमिक शिक्षण विभागाकडील उर्वरित १०० इमारतींमधून १०० व्हर्च्युअल क्लासरुम्स् व २०० शाळांमधून ६०० डिजिटल क्लासरुमचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. उपरोक्त शाळांमधून ॲडॅप्टीव्ह लर्निंग मॅनेजमेंट, स्कुल मॅनेजमेंट सिस्टिम इत्यादी संगणकीय प्रणालीचापर्याप्त वापर करण्यात येणार आहे.
- प्राथमिक शिक्षण विभागाकडील ५ इमारतींमधून PMC Models of Excellenceप्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये Building As Learning Aid (BALA)धर्तीवर इमारतीमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्यामध्ये मैदाने विकसीत करुन विविध क्रीडा विषयक उपक्रम राबविणे, रोबॅटिक लॅब, म्युझिक रुम, विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठीशिक्षकांची अध्यापन पध्दतीमधील क्षमतावाढ करण्यात येणार आहे.
- विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन सहयोगी दल व तदनुषंगिक शैक्षणिक उपक्रमाद्वारे नाविण्यपूर्ण योजना राबविणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

## माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिका

## सन २०१८-१९

- **पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांकडील विद्यार्थ्यांसाठी राबविलेले विशेष उपक्रम.**
- **मोफत पाठयपुस्तके व मोफत गणवेश** –इ.९वी व १०वी च्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके बालभारती संस्थेकडून वेळेत खरेदी करून देण्यात आली.पुणे मनपाच्या संचलित, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकडील इ. ५वी ते १२वी च्या १११६० विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मोफत देण्यात आला असून गणवेशाची रक्कम रु. २,२४,७१,९१७/- डी.बी.टी. अंतर्गत त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.
- **मोफत बसपास सुविधा**- मा. मुख्य सभेच्या मान्यतेने २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात पुणे महानगरपालिका शाळांकडीलइ. ५वी ते १०वी पर्यंतच्या शहर निवासी एकुण ६९२३ विद्यार्थी व विद्यार्थीनींतसेच खाजगी शाळांकडील ६२४१ असे एकुण १३१६४ विद्‌यार्थ्यांना मोफत बसपास देण्यात आले असून आतापर्यंत रक्कम रु. ६ कोटी इतकी रक्कम ॲडव्हान्स म्हणून पीएमपीएमएलकडे जमा केली आहे.
- **मोफत २१ अपेक्षित प्रश्न संच**- इ. १०वी च्या विद्यार्थ्यांना मोफत २१ अपेक्षित प्रश्न संचाची रक्कम डी.बी.टी अंतर्गत खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
- **शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना –** पुणे मनपाच्या माध्यमिक शाळांमधील व राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूलमधील इ. १०वीमध्ये ८५% पेक्षा अधिक गुण घेऊन पास झालेले १०१ विद्यार्थी तसेच इ. १२वीमध्ये८०% पेक्षा अधिक गुण मिळालेल्या ८५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५१०००/- रूपये याप्रमाणे १८६ विद्यार्थ्यांना रक्कम रु. ९४,८६,०००/- शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला.
- **NSQF (National Skill Qualification Framework)**अंतर्गत पुणे महानगरपालिका संचलित १७माध्यमिक विद्यालयांमध्ये सन २०१४-१५ मध्ये सदरची योजना इ. ९वी साठी Lend A Hand India व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आली आहे. सध्या २०१८-१९ मध्ये इ. ९वी ते १२वी माध्यमिक शाळांमध्ये शिकत असलेल्या ११०० विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण शिकवले जात आहे.
- **सी.एस.आर. अंतर्गत उपक्रम –**

  स्टेप-अपफाऊंडेशन- विविध शाळांमध्ये जीवनमूल्य शिक्षण (समुपदेशन) प्रकल्प,
  सलाम बॉम्बे फाऊंडेशन – व्यवसायभिमुख कौशल्य प्रशिक्षण व तंबाखू मुक्त शाळाउपक्रम,
  विज्ञान आश्रम, सायन्स फॉर ऑल, मेंटर टुगेदर, अगस्त्था फाऊंडेशन , स्त्री मुक्त संघटना – विज्ञान व समुपदेशन विषयक विविध उपक्रम,सामाजिक आर्थिक विकास संस्था – विज्ञान शिक्षक प्रशिक्षण, विदयार्थ्यांची विज्ञान केंद्र भेट व प्रकल्प सादरीकरण या प्रमाणे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## सन २०१९-२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- सन २०१८-१९ मध्ये राबविण्यात आलेल्या मोफत पाठयपुस्तके व गणवेश, मोफत बस पास सुविधा, मोफत २१ अपेक्षित प्रश्नसंच, शारदाबाई पवारशिष्यवृत्ती योजना, NSQF (National Skill Qualification Framework) योजना, सॅनिटरी नॅपकिन, ११वी व १२वी द्वीलक्षी अभ्यासक्रम, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, सी.एस.आर. अंतर्गत उपक्रम सन २०१९-२० मध्येही प्रभावीपणे राबविण्यात येतील व त्याकरिता अधिक सुधारणा व सुसूत्रता करण्यात येणार आहे.

## (१७) सामान्य प्रशासन

### सन २०१८–१९

- **e worksheetद्वारे कर्मचाऱ्यांचे कामकाजाचे सनियंत्रण व प्रकरणांचा जलद निपटारा–**

  पुणे महानगरपालिकेत दाखल होणारे विविधि प्रस्ताव, प्रकरणे, अर्ज कागदपत्रे इत्यादींवर विहित मुदतीत कार्यवाही होते अगर नाही? प्रकरण सध्या कोणत्या स्तरावर आहे, कोणाकडे प्रलंबित आहे, प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे? माहिती ऑनलाईन एका क्लीकद्वारे कळण्यासाठी व अशा स्वरुपाच्या कार्यवाहीतून नागरिकांच्या कामाचा निपटारा जलदगतीने व विहित मुदतीत होण्यासाठी पुणे महानगरपालिकेत गतवर्षीपासून"File Tracking System" कार्यान्वित करण्यात आली आहे.

  चालू आर्थिक वर्षापासून Online Inward झालेले प्रकरण त्याचे कामकाज पाहणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडे ऑनलाईन पाठवण्याची सुविधा File Tracking Systemमध्ये करण्यात आली आहे. संबंधित अधिकारी यांनी त्या प्रकरणावर कार्यवाही पूर्ण करुन त्याची नोंद याSystemमध्ये करावयाची आहे. अशाप्रकारे प्रत्येक कर्मचाऱ्यांचीE-worksheetतयार होऊन प्रत्येक खातेप्रमुखासsystemच्याdash-boradवर जाऊन कर्मचाऱ्यांकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत हे केव्हाही तपासणे शक्य झाले असल्याने कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर सनियंत्रण ठेवून जलदगतीने प्रकरणांचा निपटारा करणे शक्य झाले आहे.

- **लेखनिकी संवर्गातील ५० वर्षे वयाच्या आतील कर्मचाऱ्यांसाठी MS-CITव टायपिंगचे प्रशिक्षण –**

  लेखनिकी संवर्गातील कर्मचाऱ्यांना संगणकावर करावयाची कामे व टंकलेखनाचे काम करणे अनिवार्य असते. तथापि, जे कर्मचारी MS-CITव टायपिंगची परीक्षा उत्तीर्ण नाही, ज्यांना संगणकाचे व टायपिंगचे काम करण्यात अडचणी येतात अशा कर्मचाऱ्यांना या कामाची आवड निर्माण करण्याकरीता म.न.पा प्रशिक्षण प्रबोधिनीच्या व समाज विकास विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून समाज विकास विभागामार्फत प्रशिक्षण देण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या योजनेमुळे संगणकावर व टायपिंगचे कामासाठी जास्तीत जास्त सेवकवर्ग उपलब्ध होऊन खात्याचे कामकाज वेळेत व अचूकपणे करणे शक्य होणार आहे. पहिल्या टप्प्यात मार्च २०१९ अखेर १०३ कर्मचाऱ्यांना MS-CIT चे प्रशिक्षण व १३६ कर्मचाऱ्यांना टायपिंगचे प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

- **आपले सरकार व पी.जी. पोर्टल या तक्रार निवारण प्रणालीवर दाखल होणाऱ्या तक्रारींचा निपटारा –**

  आपले सरकार पोर्टलवर प्राप्त झालेल्या ७१०२ तक्रारींपैकी ७०४३ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. प्रलंबित तक्रारींची संख्या १% आहे. तसेच पी.जी. पोर्टलवर प्राप्त झालेल्या २३६७ तक्रारींपैकी २३३० तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. प्रलंबित तक्रारींची संख्या २% आहे.

- **सेवानिवृत्त सेवकांना विनाविलंब पेन्शन व देय रकमा अदा करणेबाबत उपाययोजना –**

  सेवानिवृत्त सेवकांना पेन्शन सुरु करणेस विलंब होऊनये म्हणून अंतर्गत अर्थान्विक्षक (वेतनपत्र विभाग) यांनी दरवर्षी तपासणी शिबिर आयोजित करुन सेवापुस्तकाची पडताळणी करुन मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाकडील आक्षेपांचे मुद्दे (तपशील) प्रमाणे आवश्यक नोंदी केल्याची खात्री करुन सेवापुस्तक प्रमाणित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच मुख्य लेखापरीक्षक कार्यालयानेही दर तीन वर्षानी सेवापुस्तके तपासणी शिबीर आयोजित करण्याबाबत दिनांक ३०.१०.२०१८ च्या कार्यालयीन परिपत्रकाने निर्देश देण्यात आले असल्याने आक्षेपांची पूर्तता वेळेत होऊन पेन्शन विनाविलंब सुरु करणे सोयीचे होणार आहे.

- **कर्मचारी प्रशिक्षण –**
  नवनियुक्त २०४ कनिष्ठ अभियंता यांचेकरीता मनपाच्या विविध विभागांचे तांत्रिक व अभियांत्रिकी कामाचे प्रशिक्षण तसेच लेखनिकी संवर्गातील २०० कर्मचाऱ्यांसाठी अनुकंपा व वारस प्रकरणे कार्यपध्दती, माहिती अधिकार या विषयांवरील उजळणी प्रशिक्षण घेण्यात आले आहे. पुढील टप्प्यात मार्च २०१९ अखेर लेखनिकी संवर्गातील १३०० कर्मचाऱ्यांना मनपा सेवाविनिमयातील तरतुदी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीतील, कार्यालयीन रचना व कार्यपध्दती, ६ गठ्ठे कार्यपध्दती इ. विषयावरील प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे लेखनिक कर्मचाऱ्यांची दैनंदिन कामकाज सुलभतेने व बिनचूक करणेस मदत होणारआहे. त्याच बरोबर सर्व खातेप्रमुख व क्षेत्रीय अधिकारी यांना दैनंदिन कामकाजात इंटरनेटचा वापर सुरक्षितपणे करता यावा यासाठी Cyber Awareness & Cyber Technology या विषयाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. पुढील टप्प्यात वर्ग २ व वर्ग ३ मधील अधिकारी कर्मचारी यांना या विषयावरील प्रशिक्षण देण्यात येणार आहे. महिला कर्मचाऱ्यांसाठी 'महिलांचे आरोग्य' व 'POSH- Preventation of Sexural Harrassment'या विषयावरील प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

- नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांमध्ये कार्यरत असलेले सेवकांपैकी पुणे महानगरपालिकेने ५०० सेवकांना पुणे महानगरपालिकेच्या सेवेमध्ये समावून घेण्यात आले आहे.

**सन २०१९ –२०**

- **HRMS (Human Resource Management System)प्रणालीमुळे उपलब्ध e Service Bookमाध्यमाने कोणत्याही कर्मचाऱ्यांचे संपूर्ण रेकॉर्ड एका क्लिक व्दारे उपलब्ध**
  HRMS(Human Resource Management System)प्रणालीमुळे अधिकारी/कर्मचारी यांचे सेवा तपशिलामध्ये वेळोवेळी होणारे बदल (वार्षिक वेतनवाढ,कालबध्द पदोन्नती, प्रत्यक्ष पदोन्नती,शैक्षणिक पात्रतेमधील बदल (Educational up Gradation) विभागीय चौकशी, शास्ती, निलंबन, गोपनीय अहवाल/मालमत्ता विवरणपत्र defaultars,परदेश दौरा इत्यादी) इ.माहिती वेळोवेळी अद्यावत केली जाणार आहे. या प्रणालीमुळे कोणत्याही सेवकाचे सर्व्हिस रेकॉर्ड व कागदपत्रे एका क्लिकव्दारे संबंधित खातेप्रमुखांना पाहता येणार आहे.त्यामुळे सेवकांची बदली करताना, बढती देताना तसेच प्रशासकीय कार्यवाही अथवा शास्ती करावयाची असल्यास निर्णय प्रक्रिया सुलभ होणार आहे.

- **सातवा वेतन आयोग तरतूद –**
  **केंद्र व राज्य शासनाप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यासांठी सातवा वेतन आयोग लागु करण्यासाठी सन २०१९-२० मध्येर.रू. ४० कोटीतरतूद केली आहे.**

## (१८) <u>आपत्ती व्यवस्थापन विभाग</u>

**सन २०१८–१९**

- सन २०१८-१९ या वर्षाकरीता आपत्ती व्यवस्थापन विभागासाठी एकुण र.रु.१७ कोटी ३० लाख इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली होती. सदर तरतूद मधून क्विक रिस्पॉन्स टिम व व्हेईकल ज्यामध्ये सर्च ॲन्ड रेस्क्यु करणाऱ्या यंत्रणे बरोबर, कम्युनिकेशन व प्रथमोपचारअशी यंत्रणा उपलब्ध असणारी यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली आहे. क्विक रिस्पॉन्स टिम व व्हेईकलचा वापर रस्ते अपघात, इमारत कोसळणे, आगीमध्ये सापडलेल्या व्यक्तीची सुटका करणे, सर्च ॲन्ड रेस्क्युमधील अडथळे दूर करणे, जखमी व्यक्तीचे स्थलांतर करणे इ. साठी क्विक रिस्पॉन्स टिम व व्हेईकलचा उपयोग होत आहे. आगीच्या ठिकाणी आग विझविण्याकरीता आवश्यक असणारे मदत कार्य व व्यक्तिंना सुखरुप बाहेर काढण्याकरीता आवश्यक असणारे सर्च ॲन्ड रेस्क्यु ऑपरेशन याकरीताची साधने सदर वाहनामध्ये उपलब्ध असल्याने घटनेतील व्यक्तिला तात्काळ बचावासाठी मदत मिळत आहे.

**सन २०१९–२०**

- आपत्ती व्यवस्थापन विभागासाठी सदर तरतुदीतून क्विक रिस्पॉन्स टिम व व्हेईकल ज्यामध्ये सर्च ॲन्ड रेस्क्यु करणारी यंत्रणे बरोबर, कम्युनिकेशन व प्रथोमपचार अशी यंत्रणा उपलब्ध असणारी यंत्र सामुग्री खरेदी करण्यात आल्या होत्या. सदर खरेदी करण्यात आलेल्या यंत्रणेचा ऑपरेशन व मेन्टेनन्स आणि संचालनाकरीता एकूण र.रु. ६ कोटी ६० लाख इतका खर्च येणार आहे. तसेच आवश्यकते नुसार क्विक रिस्पॉन्स टिम व व्हेईकल खरेदी केल्यास FE17A190 या बजेट हेडवर र.रु.१० कोटी इतकी तरतूद आवश्यक आहे.
- नैसर्गिक आपत्ती ग्रस्त व अपघात ग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत–र.रू .१ कोटी तरतूद करण्यात आली आहे.
- पुणे शहरात उद्भवणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती आणि मोठे अपघात यांना प्रतिसाद, शोध बचाव कार्य व नियंत्रण कक्ष संचलन इ. तातडीने करावयाच्या खर्चासाठी या बजेटहेडवर तरतूद र.रु.५० लाख१५ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनेच्या दृष्टीने जनजागृती करणे र.रु.५० लाखपुणे मनपाच्या विविध विभागांकरिताआपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे, प्रशिक्षण व क्षमता बांधणी आणि जनजागृती – र.रु.६० लाख.

## (१९) <u>समाज विकास</u>

**सन २०१८–१९**

- **पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत दारिद्र्य रेषेखालील व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी खालीलप्रमाणे योजना राबविणेत येतात.**
- केंद्र व राज्य शासनाची दिनदयाळ अंत्योदय योजनाराष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान योजना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी सन २०१४ पासुन राबविणेत येत आहे. या योजनां करीता शासनाकडून निधी प्राप्त होतो. या व्यतिरिक्त मनपा अर्थसंकल्पातील बांधील खर्च वजा जाता ५% रक्कम महिला बाल कल्याण, ५% रक्कम मागासवर्गीयांसाठी व ३% रक्कम दिव्यांगांसाठी राखून ठेवली जाते. खात्यामार्फत महिला बाल कल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, युवक कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना इ. योजना राबविल्या जातात.
- **स्वयंरोजगार उपक्रम** – व्यवसाय प्रशिक्षण, उद्योजकता विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी अनुदानकेंद्र व राज्य शासनाची दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी, क्षमता बांधणी व प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगार व नोकऱ्यांची उपलब्धता, स्वयंरोजगार कार्यक्रम, फेरीवाल्यांना सहाय्य, शहरी बेघरांना निवारा योजना शासनाच्या निधीतून राबविल्या जातात. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्ये नागरिकांसाठी सेवा केंद्र, बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तु विक्री करीता आधार केंद्र, पुणे महानगर समाज विकास संस्था यांचा समावेश आहे.
- **बचत गटांसाठी योजना** – शहर पातळीवर सुमारे ८५७७ बचत गट कार्यरत असून बचत गट स्थापनेसाठी महिलांना प्रशिक्षण, फिरता निधी, बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंसाठी प्रदर्शन व विक्री करीता अर्थसहाय्य, स्वस्त धान्याची दुकाने देणे. तसेच मनपाच्या प्राथमिक शाळेतील सुमारे ७०००० विद्यार्थ्यांना शासनाच्या मध्यान्ह भोजन योजने अंतर्गत मध्यान्ह भोजन व बालवाडीतील १२००० मुलांना बचत गटांच्या माध्यमातून शालेय पोषण आहार दिला जातो.
- **महिलांसाठी योजना** – विधवा महिलांना अनुदान, महिलांना कुटुंब नियोजनासाठी प्रोत्साहन, महिला सबलीकरण केंद्र, महिला/युवती यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण, मुलगी दत्तक योजना, पाळणाघर, वस्तीपातळीवरील विविध प्रशिक्षण वर्ग व अनुदान, महिलांसाठी योगासन वर्ग इ. योजना राबविण्यात येतात.

- **विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना –** इ. १० वी व इ. १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी खाजगी क्लास फी अर्थसहाय्य, सीईटी क्लास फी अर्थसहाय्य, उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल करीता अर्थसहाय्य, कमवा व शिका योजना इ. १० वी व इ. १२ वी मध्ये ८०% अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य, स्पोकन इंग्लिश वर्ग, अभ्यासिका, ग्रंथालय, घाणभत्ता मिळणाऱ्या मनपा सेवकांच्या मुलांना अर्थसहाय्य, पुणे महानगरपालिका हद्दीतील कचरा वेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे तसेच कचऱ्याच्या संबंधित काम करणाऱ्या सर्व असंघटीत कष्टकरी कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य, स्पर्धा परिक्षा केंद्र, मनपाच्या माध्यमिक प्रशालेतील मुलांना शैक्षणिक साहित्य इ. उपक्रम राबविले जातात.
- **भौतिक सुविधा उपक्रम** –झोपडपट्टीमध्ये वैयक्तिक शौचालय बांधणे, झोपडी दुरूस्ती, वीज कनेक्शन, नळ कनेक्शन इ. करीता मागासवर्गीय यांना अर्थसहाय्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहातील ४०० विद्यार्थ्यांचा भोजनाचा खर्च दिला जातो.
- **सामाजिक उपक्रम –** वृद्धांसाठी विरंगुळा केंद्र, व्यसनमुक्तीसाठी अर्थसहाय्य, रस्त्यावरील मुलांसाठी घरटं प्रकल्प, रात्र निवारा प्रकल्प, बाल विकास केंद्र इ. उपक्रम राबविण्यात येतात.
- **दिव्यांग कल्याणकारी योजना –** दिव्यांगाना मोफत पीएमपीएमएल बसपास, कृत्रिम अवयव घेणे, स्वयंरोजगार, उच्च शिक्षण, प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य, महापालिका क्षेत्रातील १८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य, कुष्ठरोगपिडीत व १००% अतितीव्र अपंग (असमर्थ) व्यक्तीकरिता वार्षिक अर्थसहाय्य दिले जात आहे.
- पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने पुणे शहरात औंध, येरवडा, हडपसर, वारजे, सावित्रीबाई फुले स्मारक भवानी पेठ या ठिकाणी लाईट हाऊस प्रकल्प सुरू आहेत.
- प्रत्येक घरामध्ये एक व्यक्ती डिजीटल साक्षर व्हावा या उद्देशाने पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने पुणे शहरात विविध ठिकाणी डिजीटल लिट्रसी सेंटर सुरू आहेत.

### सन २०१९–२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक –

- समाज विकास विभागामार्फत वरील योजनांची अंमलबजावणी करणेत येते. या करीता तसेच नव्याने राबविणेत येणाऱ्या योजनांकरीता २०१९–२०२० चे अर्थसंकल्पात र.रू. ९३.७० कोटीची तरतूद सुचविणेत आली आहे.

**सन २०१९–२०२० मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना –**

सन २०१८–१९ मध्ये राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना यावर्षीही प्रभाविपणे राबविण्यात येणार आहे. तसेच –

- दिव्यांगांसाठी महत्वाच्या स्थानिक बस स्टॉप/डेपोमध्ये व्हिलचेअर उपलब्ध करणे.
- अंध व्यक्तींकरिता ऑडिओ लायब्ररी सुरूकरणे.
- दिव्यांगांसाठी क्रीडा स्पर्धा आयोजित करणे.
- दिव्यांगांसाठी व्यायाम शाळा सुरूकरणे.
- दिव्यांगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या योजनांचा प्रचार/प्रसार करणे.
- मनपा इमारती, सभागृह, कार्यालय या ठिकाणी दिव्यांगांसाठी पायाभुत सुविधा उपलब्ध करून देणे.
- **संघटीत/असंघटीत क्षेत्रात काम** करणाऱ्या स्त्रीयांच्या सोयीसाठी प्रत्येक वॉर्डामध्ये पाळणाघराची व्यवस्था करण्यात येणार आहे. याकरिता एकुण र.रू. ३.५० कोटी आवश्यक असून त्यापैकी र.रू. २ कोटीची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम सी.एस.आर. मार्फत उपलब्ध होणार आहे.
- सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठीSafety Mapping & Safety Auditकरण्यात येणार आहे.
- Gender Responsibility अभ्यासगट तयार करणे व शहर पातळीवर महिलांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

## (२०) कामगार कल्याण विभाग

### सन २०१८ – १९

- **मृत सेवकांच्या वारसांना अर्थसहाय्य –**

  मृत सेवकांच्या ३ वारसांना र.रु. ३५,०००/- प्रमाणे रु. १,०५,०००/-, ८१ वारसांना र.रु. ५२,५००/- प्रमाणे रु. ४२,५२,५०० असे एकूण र.रु. ४३,५७,५००/- अर्थसहाय्य आदा करण्यात आलेले आहे.

- **कामगार कल्याण निधी –**

  आषाढी वारीनिमित्त आळंदी ते पुणे दरम्यान कामगार दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.

  इयत्ता दहावी व बारावीमधील अनुक्रमे ७० व ३४ महापालिका सेवकांच्या विशेष प्राविण्य मिळविलेल्या पाल्यांचा गुणगौरव करणेत आला आहे.

  मृत सेवकांच्या २ वारसांना रु. १५,०००/- प्रमाणे रु. ३०,०००/- व ६७ वारसांना रु. २२,५००/- प्रमाणे रु. १६,४२,५००/- असे एकुण रु. ७३ वारसांना रु. १६,७२,५००/- वारस अनुदान वितरित करणेत आले आहे.

  एका मनपा सेवकांच्या पाल्यास रु. १३,०००/- शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती वाटप करणेत आली आहे.याशिवाय एकूण ३१ गुणवंत कामगार पुरस्कार कामगार कल्याण निधीमार्फत वितरित करण्यात आले आहे.

- **मराठी भाषा संवर्धनसमिती –**

  मराठी भाषा संवर्धन समितीमार्फत पुणे मनपाच्या विविध उद्यानांमध्ये ३ साहित्य कट्ट्यांचे आयोजन करणेत आले आहे. याशिवाय भव्य मराठी ग्रंथ महोत्सव, कवी संमेलन, साहित्य पुरस्कार वितरण इत्यादी कार्यक्रम प्रस्तावित आहेत.

- **ध्वजदिन निधी संकलन –**

  सन २०१८-१९ मध्ये मा.जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या उद्दिष्टानुसार मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून रु. १६,६४,८००/-ध्वजदिन संकलित करण्यात आला आहे.

- **अपघात विमा योजना –**

  पुणे महापालिका कायम आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी समुह अपघात विमा योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत माहे डिसेंबर, २०१८ पर्यंत ५ कर्मचाऱ्यांना रु. ५० लाख नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

- **सांस्कृतिक कार्यक्रम –**
  दिनांक १ मे कामगार दिनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन प्रतिवर्षी करण्यात येते.

### सन २०१९ – २०

**अधिक प्रभावीपणे खालील योजना राबविण्यात येणार आहेत.**

- कामगार प्रशिक्षण वर्ग
- गुणवंत कामगार पुरस्कार
- मराठी भाषा संवर्धन समितीचे उपक्रम
- अपघात विमा योजना
- महिलांसाठी विविध योजना/सांस्कृतिक कार्यक्रम/प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येणार आहे.

## (२१) भूसंपादन व व्यवस्थापन विभाग

### सन २०१८ – १९

- पुणे महानगरपालिकेस आवश्यक आरक्षित जागा भूसंपादन कायद्यान्वये ताब्यात घेण्याची कार्यवाही या विभागांतर्गत करण्यात येते. जुना भूसंपादन कायदा १८९४ नुसार एकुण २८३ भूसंपादन प्रकरणाची कार्यवाही शासनातर्फे विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१५ व १६ यांचेमार्फत सुरु होती. तथापि नवीन कायदा २०१३ च्या तरतुदीनुसार अंमलबजावणी करणेकरिता त्यांनी एकूण २८३ चालु प्रकरणांपैकी ४५ प्रकरणांची नविन भूसंपादन कायद्यानुसार सद्यस्थितीत कार्यवाही सुरु ठेवलेली असून ऊर्वरित २३८ प्रकरणे संबंधित खात्यांच्या प्राधान्यक्रमानुसार व उपलब्ध होणाऱ्या आर्थिक तरतुदीनुसार पुनर्जिवित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजना आराखडयामधील विविध आरक्षित जागांचा प्राधान्याने विकास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक तरतुदी आतापर्यंत भूसंपादन व व्यवस्थापन या विभागाचे अर्थशिर्षकावर करण्यात येत होत्या. तथापि यापुढे संबंधित आरक्षण विकसित करणाऱ्या खात्यांनी त्या आरक्षणाच्या जागांचे भूसंपादन करणेसाठी आवश्यक त्या तरतुदी त्या-त्या खात्यांचे अर्थशिर्षकावर करणेत येणार आहे.
- चांदणी चौक येथील महत्वाकांक्षी रस्ते व वाहतुक नियोजन प्रकल्प राबविण्यासाठी करावयाचे जागेच्या भूसंपादनाकरिता राज्य शासनाकडून र.रू. १८५ कोटी पैकी र.रू. ३७ कोटी प्राप्त झाले आहेत.

### सन २०१९ – २०

**दृष्टीक्षेपात अर्थसंकल्पीय अंदाज सन २०१९-२०**

- पुणे महानगरपालिकेस आवश्यक आरक्षित जागा भूसंपादन कायद्यान्वये ताब्यात घेण्याची कार्यवाही या विभागांतर्गत करण्यात येते. जुना भूसंपादन कायदा १८९४ नुसार एकुण २९१ भूसंपादन प्रकरणाची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयाअतर्गत विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१५ व १६ यांचेमार्फत सुरु होती. तथापि भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना आणि पुनर्वसन अधिनियम २०१३ च्या तरतुदीनुसार अंमलबजावणी करणेकरिता त्यांनी एकुण २९१ चालु प्रकरणांपैकी ४९ प्रकरणांची नवीन भूसंपादन कायद्यानुसार सद्यस्थितीत कार्यवाही सुरु ठेवली असून ऊर्वरित २४२ प्रकरणे संबंधित खात्यांच्या प्राधान्यक्रमानुसार व उपलब्ध होणाऱ्या आर्थिक तरतुदीनुसार पुनर्जिवित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे. चालू असलेल्या भूसंपादनासाठी, निवाडा मंजूरीवर प्रलंबित प्रकरणी तसेच निवाडा मंजूर असलेली तथापि नुकसान भरपाई रक्कम प्राप्त नसलेने निवाडा जाहीर होणेवर प्रलंबित एकूण १८ प्रकरणांसाठी र.रू.१२८६.२७ कोटी इतकी तरतूद आवश्यक आहे. त्यापैकी विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१५ व १६, पुणे यांनी कळविल्यानुसार एकूण १२ प्रकरणे निवाडा घोषित करणेवर आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजना आराखडयामधील विविध आरक्षित जागांचा प्राधान्याने विकास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक तरतुदी आतापर्यंत भूसंपादन व व्यवस्थापन या विभागाचे अर्थशिर्षकावर करण्यात येत होत्या. तथापि यापुढे संबंधित आरक्षण विकसित करणाऱ्या खात्यांनी त्या आरक्षणाच्या जागांचे भूसंपादन करणेसाठी आवश्यक त्या तरतुदी त्या-त्या खात्यांचे अर्थशिर्षकावर करणेत येणार आहे.
- कोथरुड व बावधन येथील चांदणी चौक येथील उड्डाणपुलाचे पोहोच मार्गासाठी आवश्यक जमिनीचे भूसंपादन करणेकामी महाराष्ट्र शासनाकडून उर्वरित र.रू.१४८ कोटी इतका निधी मिळणार आहे.

- तसेच पुणे महानगरपालिकेमार्फत विहित कालमर्यादेमध्ये राबविण्यात येणाऱ्या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जागा संपादन करण्याकरिता पुणे महानगरपालिकेकरिता सन २०१७ मध्ये मान्य करण्यात आलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील Reservation Credit Bondच्या तरतूदीचा वापर करण्याचा मानस आहे.

**पुणे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणेसाठी आगामी वर्षात निश्चित केलेल्या उपाययोजना –**

- पुणे महानगरपालिका हद्दीतील थकीत मिळकतधारकाकडून थकीत मिळकत कर वसूल करणे.
- पुणे महानगरपालिकेतील थकीत पाणीपट्टीवर विशिष्ट भर देऊन थकीत पाणीपट्टी वसूल करणे.
- कर आकारणी न झालेल्या मिळकती शोधुन कर आकारणीच्या जाळ्यात आणून मिळकत कराचे उत्पन्न वाढविणे.
- जीआयएसच्या माध्यमातून यापूर्वी कर आकारणी झालेल्या मिळकतीमधील त्रृटी सुधारित / दुरूस्ती करून सुधारीत मिळकत कराची वसुली करणे.
- ज्या निवासी मिळकतीचे क्षेत्र १००० चौ. फुटापर्यंत आहे, अशा मिळकतींना यापूर्वी दुप्पट/तीनपट कर आकारणी करण्यात आली होती.आता मा. मुख्य सभेच्या मान्यतेनंतर मागील वर्षाची थकबाकी वसूल करून दि. ०१.०४.२०१९ पासून एकपट कर आकारणी करण्यात येणार आहे.
- ज्या निवासी मिळकतीचे क्षेत्र १००० चौ. फुटापेक्षा जास्त आहे, अशा मिळकतींना यापूर्वी तीनपट कर आकारणी करण्यात आली होती.आता मा. मुख्य सभेच्या मान्यतेनंतर मागील वर्षाची थकबाकी वसूल करून दि. ०१.०४.२०१९ पासून दिडपट कर आकारणी करण्यात येणार आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या स्वतःच्या मालकीचे मिळकती उदा. ओपन स्पेस, ॲमिनिटी स्पेस, सदनिका, गाळे यांचे मॅपिंग सर्व्हेक्षण करून योग्य पध्दतीने योग्य वापराच्या माध्यमातून उत्पन्नात वाढ करणे.
- भाडेतत्वावर देण्यात आलेल्या सर्व मिळकतींचा आढावा घेऊन अनाधिकृत हस्तांतरीत प्रकरणामध्ये योग्य ते तडजोड शुल्क आकारून उत्पन्नात वाढ करणे.
- मोकळ्या जागेच्या कमी वापराचा पर्याय तपासून त्या माध्यमातून उत्पन्न वाढीचा प्रयत्न करणे.
- आकाशचिन्ह परवानाकडील कामाचे आधुनिकीकरण करूनशहराला विद्रुपीकरणातून मुक्त करणे व मनपाच्या उत्पन्नात भर घालणे.
- एसआरएच्या योजनेतून धोरणानुसार कमी दराने कर आकारून वसूल करणे.
- गवनि विभागातील ज्या मिळकतीना सेवा शुल्काची बिले जात नाही अशा मिळकतींचा सर्व्हे करून रेकॉर्ड अद्यावत करून सेवा शुल्क व पाणीपट्टीची वसूल करणे.
- अंदाजपत्रकातील निधिचा वापर करताना योग्य विचार विनिमय करून तपासणी करून योग्य निधी खर्च करणे.
- वित्तीय शिस्त येण्याच्या दृष्टीकोनातून त्याची खात्री करण्यासाठी प्रशासकीय दृष्टया वेगवेगळी पाऊल उचलता येणार आहे.

# दृष्टीक्षेपात अंदाजपत्रक–

## प्रमुख जमा बाबी :–

### (१) स्थानिक संस्था कर

**सन २०१८–१९**

- माहे एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०१८ अखेर

  १) वस्तु व सेवा कर अनुदान र.रु.१,१७९.५४कोटी

  २) १% मुद्रांक शुल्क र.रु.७३.४३ कोटी

  ३) स्थानिक संस्था कर विविध बाबींपासून प्राप्त उत्पन्नर.रु. २.३० कोटी असे एकुण र.रू.१२५५.३७कोटीचे उत्पन्न प्राप्त झालेले असून, खालील तक्यात नमूद केलेले संभाव्य उत्पन्न र.रु.५४६.२८ कोटी गृहीत धरता सन २०१८–२०१९ या आर्थिक वर्षात मा. महापालिका आयुक्त यांनी अंदाजपत्रकात सुचविल्याप्रमाणे र.रु.१८०१.६५ कोटी उत्पन्नाचे उद्यिष्ट प्राप्त होऊ शकेल.

| अ.क्र. | अपेक्षित उत्पन्न तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | माहे जानेवारी १९ ते मार्च २०१९ या तीन महिन्याचे वस्तु व सेवा कर अपेक्षित अनुदान (दरमहा र.रु. १३१.०६ कोटी प्रमाणे) | ३९३.१८ कोटी |
| २ | माहे ऑक्टोंबर २०१८ ते मार्च २०१९ या सहा महिन्याचे १% मुद्रांक शुल्क अपेक्षित उत्पन्न (दरमहा अंदाजे र.रु.२५.०० कोटी प्रमाणे) | १५०.०० कोटी |
| ३ | माहे डिसेंबर १८ ते मार्च २०१९या चार महिन्यामधील स्थानिक संस्था कराचे संभाव्य प्राप्त उत्पन्न | ०३.१० कोटी |
| **एकूण संभाव्य प्राप्त होणारे अपेक्षित उत्पन्न** | | **५४६.२८ कोटी** |

- ज्या व्यावसायिक/नोंदणीधारकांनी स्थानिक संस्था कर भरलेला नाही किंवा अत्यल्प प्रमाणात भरलेला आहे. अशा व्यावसायिक/नोंदणीधारकांना कागदपत्रांसह सुनावणीस हजर राहणेबाबत नोटीसा बजावण्यात आल्या असून ज्या व्यावसायिकांच्या विवरणपत्रामध्ये तपासणीअंती स्थानिक संस्था कराचा भरणा कमी भरलेला आहे, अशा व्यावसायिकांकडून स्थानिक संस्था कराची वसुली करण्यात येत आहे.

| **दृष्टीक्षेपात अंदाजपत्रक – सन २०१८–१९** |
|---|
| **प्रमुख बाबी**<br>**स्थानिक संस्था कर –**<br>**उद्दीष्ट – र.रू. २,००७.०० कोटी**<br>**प्रत्यक्ष जमा – र.रू. १२५५.३७ कोटी (डिसेंबर २०१८ अखेर)** |

- मे. राज्य शासनाकडून दि.०१.०७.२०१७ पासून माहे मार्च २०१८ अखेर दरमहा र.रु.१३७.३० कोटीचे वस्तु व सेवाकर अनुदान प्राप्त होत होते. तथापि, मे. राज्य शासनाकडून सन २०१८–१९ या आर्थिक वर्षात सदरहू अनुदानामध्ये वाढ न करता ते दरमहा र.रु.१३१.०६ कोटी याप्रमाणे अनुदान प्राप्त होत आहे. त्यामध्ये वाढ होणेकामी मे. राज्य शासनाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करुन व प्रत्यक्ष जाऊन पाठपुरावा करण्यात आलेला असून सन २०१९–२० मध्ये अनुदानात वाढ अपेक्षित आहे.

- सन २०१९–२० या आर्थिक वर्षात मे. राज्य शासनाकडून दरमहा र.रु.१५०.०८ कोटी प्रमाणे वस्तु व सेवा कर अनुदानापोटी र.रु.१८०१.०० कोटी, १% मुद्रांक शुल्क अनुदानापोटी र.रु.२००.०० कोटी व इतर जमेपोटी र.रु.०१.१५ कोटी असे असे एकुणर.रु.२००२.१५ कोटीचे उत्पन्न गृहीत धरण्यात आलेले आहे.

## (२) <u>मिळकत कर</u>

### सन २०१८–१९

**उद्दीष्ट र.रु. १८१६.०० कोटी**

- सवलतीच्या दराने मिळकतकर भरण्याच्या कालावधीत म्हणजेच दि. ०१.०४.२०१८ ते ३१.०५.२०१८अखेर पहिल्या दोन महिन्यात मिळकतकरापोटी र.रू. ६६६.१६ कोटीइतकी जमा झाली असून दि.३१.१२.२०१८ अखेर र.रु. ९७१.५९ कोटी इतकी जमा झाली आहे. पुढील तीन महिन्याच्या कालावधीमध्ये सुमारे र.रु. २५०.०० कोटीइतकी रकम जमा होणे अपेक्षित असून दि.३१.०३.२०१९ अखेर मिळकत करापोटी सुमारे र.रु. १२२१.५९ कोटी इतकी रक्कम जमाहोणे अपेक्षित आहे.
- मिळकतकराच्या डेटाबेसमध्ये सुमारे ७,६१,७८४ भ्रमणध्वनी क्रमांक व सुमारे ४,६६,२५७ ई–मेल आयडी समाविष्ट केलेले असून ईमेल व भ्रमणध्वनी क्रमांकावर सन २०१८–१९ मधील मिळकतकर विषयक मागणीची रक्कम मुदतीत भरणे, कराची रक्कम मुदतीत न भरल्यास दर महा आकारण्या आलेल्या २% शास्तीच्या रक्कमेची माहिती ई–मेलव्दारे बिले पाठविणे व मोबाईलव्दारे एसएमएस पाठविण्यात आलेलीआहे.
- मिळकतकराची रक्कम जास्तीत जास्त ऑनलाईन स्विकारणेबाबत खात्याकडून प्रोत्साहन देण्यात आले असून सन २०१७–१८ मध्ये ऑनलाईन कलेक्शन ४२.९०% इतकी होते तेच कलेक्शन सन २०१८–१९ मध्ये ४६.९७% इतकी झाली असून ऑनलाईन मिळकत कर भरण्याकडे मिळकतदारांचा कल वाढलेला आहे.
- जे निवासी मिळकतधारक सन १८–१९ या वर्षाचा संपूर्ण मिळकतकर भरतील त्यांना २७ फेब्रुवारी २०१९ पर्यत ५ लाखाचा अपघाती विमा संरक्षण पुणे मनपाकडून देणेत आला आहे.
- तसेच सन २०१८–१९ मध्ये यूपीआय(Unified Payment Interface) व ईबीपीपी (Electonic Bill Payment &Presentation ) प्रक्रिया पूर्ण झाली असून बिलडेस्क, टेक प्रोसेसर व सिट्रस मार्फत आरटीजीएस व एनएफटी व्दारे ऑनलाइन कर भरणा करण्यात येत आहे. नागरिकांनी त्यांच्या बँकेला ईबीपीपी (Electonic Bill Payment &Presentation ) फॉर्म भरुन दिल्यास माहे १ एप्रिल रोजी त्यांचे खात्यातून मिळकतकराची रक्कम पुणे मनपाच्या खात्यामध्ये जमा होणार आहे.
- मिळकतकराचा भरणा आयसीआयसीआय बँक, कॉसमॉस बँक, एचडीएफसी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, जनता सहकारी बँक, इंडेसन बँक या बँकातील पुणे शहरातील सुमारे १०३ शाखांमध्ये मिळकतकर भरणास्विकारला जात होता. आता नव्याने ९२ शाखांमध्येही मिळकतकर स्विकारणेबाबत यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आलेली आहे वरील सर्व बँकामध्ये सुमारे १९५ शाखांमध्ये मिळकतकर भरणा स्विकारला जात आहे.
- महाराष्ट्र राज्यामध्ये प्रथम महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्यानुसार ऑनलाईन ७२०३८ मिळकत करांचे ना हरकत प्रमाणपत्र व सुमारे २०७० इतकी नाव हस्तांतरणाची प्रकरणे ऑनलाइनव्दारे नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

### सन २०१९–२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक– उद्दीष्ट र.रु. १८१०.१४ कोटी

- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत दि. २७.१२.२०१८ अखेर निवासी, बिगरनिवासी, मोकळ्या व एकत्रित अशा सुमारे ८,९०,६७१ इतक्या मिळकती आहेत.तसेच नव्याने समाविष्टझालेल्या ११ गावातील सुमारे १,४३,००० इतक्या मिळकती आहेत. सदर मिळकतीत व आकारणी मध्ये वाढ होणार आहे. यामुळे पुणे मनपाच्या सन २०१९–२० मध्ये उत्पन्नात वाढ होणार आहे.

* मा.मुख्यसभा ठराव क्र.८०९ दि.१६.०२.२०१६ अन्वये चार वर्षे समान पाणी वाटप योजना पूर्ण होईपर्यंत पाणीपट्टीमध्ये सन २०२०-२१ पर्यंत दरवर्षी १५% ने वाढ करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.(धार्मिकस्थळांना १५% दरवाढीतून वगळण्यात आले आहे)

* घनकचरा व्यवस्थापन विभागाने उपभोक्ता शुल्क व वापरकर्ता शुल्क आकारणी करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती व मा.मुख्य सभेकडे सादर केला आहे.सदर ठरावाच्या मान्यतेनुसार कार्यवाही करणेत येईल.

* सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता म्हणजेच दि. ०१.०४.२०१९ ते ३१.०५.२०१९ मिळकत कराची रक्कम भरल्यास सर्वसाधारण करामध्ये ५% ते १०% सवलत देणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. जेणेकरून पहिल्या दोन महिन्यांमध्ये मिळकत कराची रक्कम मोठया प्रमाणात जमा होईल.

* सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये नव्याने सर्वसाधारण करामध्ये प्रत्येक टप्प्यास (slab) ५.५%, जललाभ करामध्ये १.५०%, जलनिःस्सारण करामध्ये ५.००% अशी वाढ सुचविण्यात आलेली असून त्यामुळे सुमारे र.रु. ११० कोटीवाढील उत्पन्न अपेक्षित आहे. सदरची वाढ ही मोबाईल टॉवर कंपन्या, आयटी व आयटीईएस कंपन्या यांना ही लागू राहिल.

## (३) <u>बांधकाम परवानगी व विकास शुल्क</u>

### सन २०१८-१९

* सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता सद्यस्थितीतील बांधकाम क्षेत्रातील कल, प्रस्ताव संमतीकरण व जमा महसूल यांचा ताळमेळ पाहता बांधकाम विकास विभागाकडील जमा महसूलचे रू.८१५ कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. डिसेंबर २०१८अखेर सुमारे र.रू. ४९३ कोटी जमा झालेले आहेत. तसेच ३१ मार्च २०१९ अखेर पर्यंत एकुण र. रू.७००.०० कोटी जमा होणे अपेक्षित आहे.

### सन २०१९-२० (उद्दिष्ट र.रू.८०० कोटी)

* सन २०१९-२०२० या अंदाजपत्रकीय वर्षात जमा महसुल र.रु.८०० कोटी अपेक्षित आहे. तसेच ऑनलाईन ॲटोडीसीआर (Auto DCR)जलदगतीनेबांधकाम परवानगीची कार्यपध्दती अवलंबून सदरचे उद्दिष्टपूर्ण करणे शक्य होणारआहे. पुणे मनपा हद्दीसाठी मंजूर करण्यात आलेल्या सुधारीत विकास नियंत्रण व प्रोसाहन नियमावली २०१७ मध्ये नव्याने प्रिमियम, एफ.एस.आय.ची संकल्पना मांडण्यात आली असून या नियमावलीनुसार प्रिमियम एफ.एस.आय., आय.टी./आय.टी.एस. इ. इमारतीसाठी अतिरिक्त एफ.एस.आय. व विशेष इमारतीसाठीचा अतिरिक्त एफ.एस.आय.पोटी प्रिमियम जमा होणार असल्याने सदर उद्दीष्ट गाठणे शक्य होणार आहे.

## (४) <u>पाणीपट्टी</u>

### सन २०१८-१९

* सन २०१८-१९ सालासाठी मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार पाणीपुरवठा विभागासाठी महसुली कामासाठी र.रु. ३७४.४७ कोटी व भांडवली कामासाठी र.रु ५१३.८२ कोटी असे एकुण र.रु. ८८८.२९ कोटीची तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीचे अनुषंगाने सन २०१८-१९ सालासाठी पाणीपट्टीपोटी र.रु. १९९.९० कोटी मिळणेचे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. त्या अनुषंगाने डिसेंबर, २०१८ अखेर पाणीपट्टीपोटी र.रु. ६८.०० कोटी जमा झालेले आहे.

- मीटरवरील दि. १५.०३.२०१७ अखेर एकुण नळजोड संख्या ४२९५३ इतकी असून, थकबाकी सुमारे रक्कम रू. ५०२.६३ कोटी आहे. दुबार पाणीपट्टी, नादुरुस्त मीटर बंद असल्याने, नळजोड बंद घोषित झोपडपट्टीमधील पाणीपट्टी, रस्ता रूंदीकरणामधील नळजोड इ. कारणांमुळे मीटर पाणीपट्टीची अवाजवी थकबाकी आलेली आहे. सध्याचे पाण्याचे मीटर बसविण्याची जबाबदारी संबंधित ग्राहकाची आहे. तसेच सदर मीटर मेकॅनीकल तंत्रज्ञानाचे असल्याने वारंवार नादुरूस्त होत आहे. सध्याचे सुमारे ४९% मीटर नादुरूस्त आहे व नादुरूस्तीच्या काळात सरासरी वापरापेक्षा जादा वापर गृहीत धरून बिलाची आकारणी करण्यात येते व मीटर दुरूस्त केल्यानंतर सदर बिलाची दुरुस्ती करण्यात येते. बिल दुरूस्तीची कार्यवाही खात्यामार्फत करण्यात येत असून, बिल दुरूस्ती नंतर वसूली होणारी रक्कम ही २०% ते २५% इतकी असून, अवाजवी थकबाकी निरस्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.
- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये मे.कोर्टा मार्फत ३ वेळा लोकअदालत राबविण्यात येऊन अंदाजे रक्कम रूपये **२ .९२ कोटी** थकबाकी वसुल करण्यात आली आहे.
- सन २०१८-१९ या करीता टप्पेनिहाय (टेलीस्कोपिक )पाणीपट्टी दरास मा. मुख्य सभा ठ. क्र. ५९८, दि. १२.०२.२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. मीटरद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठयाची पाणीपट्टी दरवर्षी सरासरी अंदाजे ६५ ते ६७ कोटी इतकी जमा होते. सन २०१८-१९ या अर्थिक वर्षामध्ये २०.१२.२०१८ अखेर र.रू. ६८.०० कोटी इतकी जमा झालेली आहे.

| अ. क्र. | वर्ष | वसुली (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | २०१४-१५ | ५८.०३ |
| २ | २०१५-१६ | ७१.६७ |
| ३ | २०१६-१७ | ९३.९३ |
| ४ | २०१७-१८ | ९९.९१ |
| ५ | २०१८-१९ | ६८.००<br>(डिसेंबर, २०१८ पर्यत) |

- घरगुती व बिगर घरगुतीच्या मीटर पाणीपट्टीच्या दरामध्ये टप्पेनिहाय (टेलास्कोपिक) दरवाढ मा.मुख्य सभा ठराव क्र. २२७७, दिनांक ५.२.२०१६ अन्वये मान्य करण्यात आलेली आहे. यामुळे पाण्याचा कमी वापर करणाऱ्या नळजोड धारकांना कमी दराने बिल व पाण्याचा जादा वापर करणाऱ्या नळजोड धारकांना जादा दराने बिलांची आकारणी करण्यात येणार आहे. यामुळे पाणी वापरावर परिणाम होणार असून पाणी वाया जाण्याचे प्रमाणे कमी होणे अपेक्षित आहे. तसेच या वाढीव मीटर पाणीपट्टीमुळे पाणीपुरवठा करणेसाठी होणारा खर्च भरून काढणे शक्य होणार आहे.

## सन २०१९-२०चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक (उद्दिष्ट र.रू.२८० कोटी)

- सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये शहरातील अनधिकृत नळजोड शोधून त्यावर कारवाई करण्याची मोहिम हाती घेण्यात येणार आहे. त्याप्रमाणे वेळोवेळी लोकअदालतचे आयोजन करून थकबाकीदारांकडून रक्कम वसुल करण्याबाबतची मोहिम सुध्दा राबविण्यात येणार आहे. समान पाणीवाटप योजनेमध्ये अल्ट्रासोनीक/ इलेक्ट्रामॅग्नेटीक मीटर बसविण्यात येणार असल्याने मीटर नादुरूस्तीचे प्रमाणे कमी होऊन थकबाकी कमी होण्यास मदत होणार आहे.

**वापरानुसार दर आकारणी**

| **सध्याचे दर** | | **प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|
| खप कि.लि./महिना | दर (सन २०१८) | खप कि.लि./महिना | दर (सन २०१९) |
| **झोपडपट्टी** | | | |
| कच्ची झोपडी | ३८.३/ महिना | कच्ची झोपडी | ४०.२२/महिना |
| पक्की झोपडी | ६३.८/ महिना | पक्की झोपडी | ६६.९९/महिना |
| **घरगुती पाणी वापर दर** | | | |
| ० ते १८.६० | ६.०७ | ० ते १८.६० | ६.३७ |
| १८.६० ते ३०.०० | १०.१४ | १८.६० ते ३०.०० | १०.६४ |
| ३०.०० ते ३७.५ | २०.१८ | ३०.०० ते ३७.५ | २१.१८ |
| ३७.५ पेक्षा जास्त | ३०.३२ | ३७.५ पेक्षा जास्त | ३१.८३ |
| **बिगर घरगुती वापर दर** | | | |
| ० ते २० | ५२.४८ | ० ते २० | ५५.१० |
| २० ते ४० | ५४.४६ | २० ते ४० | ५७.१८ |
| ४० ते ६० | ५७.२३ | ४० ते ६० | ६०.०९ |
| ६० पेक्षा जास्त | ६५.९३ | ६० पेक्षा जास्त | ६९.२२ |

## (५) आकाशचिन्ह परवाना

### सन २०१८–१९

- सन २०१८–१९ मध्ये जाहिरात फलकांचे दि. ०१.०४.१८ ते दि. ३०.११.१८ अखेर र.रु.९.२८ कोटी एवढे उत्पन्न प्राप्त झाले आहे. परंतु प्रति चौ.फुट र.रु. २२२/– शुल्काबाबत मे. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. १०६८४/२०१८ दाखल असल्याने दि. ०१.०४.२०१८ पासून काहीजाहिरातदारांनी शुल्क भरलेले नाही.
- सन २०१८–१९ मध्ये दि. ०१.०४.२०१८ ते ३०.११.२०१८ अखेर परमिट, परवानाचे र.रु. १०.४८ लाख व फॉर्म विक्रीपोटी र.रु.२१,६९५/– एवढे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.
- सन २०१७–१८ ते ५ जानेवारी २०१९ अखेर मनपाच्या ताब्यात असलेले दिशादर्शक कमानी व जाहिरात फलकांचे ई–ऑक्शनव्दारे र.रु.३.१७ कोटी प्राप्त झाल्याने त्यावर१८% जी.एस.टी. र.रु.५७.२१ लाख शासनास प्रदान करण्यात आलेली आहे.
- दि. ०१.०५.२०१८ पासून खात्याचे विकेंद्रिकरण झाले आहे. सन २०१८ मध्ये एकूण ३३४ अनधिकृत जाहिरात फलकांवर तसेच अनधिकृत बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, पोस्टर, झेंडे, किऑक्स असे एकुण ३,१८,३८५ वर कारवाई करण्यात आलेली आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या जाहिरात फलकावरील सन २०१७–१८ व २०१८–१९या काळातील सर्व्हिस टॅक्स, दंड व व्याजासह र.रु. ६.०९ कोटी शासनास प्रदान करण्यात आलेली आहे.

### सन २०१९–२०

- सन २०१९–२० चे जाहिरात फलकाचे, नामफलकाचे, परमिट व परवाना व फॉर्म विक्रीपोटी अंदाजे एकुण र. रु.११.७२ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. याशिवाय खात्याचे उत्पन्न वाढविणेसाठी जाहिरातीची नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेत येत असून यातून अंदाजे र. रू. १०० कोटी असे एकूण र.रु. १११.७२ कोटीचे उत्पन्न अपेक्षित आहे.
- विकेंद्रिकरणामुळे अनधिकृत/नियमबाहय जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, पोस्टर, झेंडे, किऑक्स इ.वर निविदा प्रक्रिया करुन ठेकेदारामार्फत कार्यवाही करणेसाठी सर्व क्षेत्रिय कार्यालयांना पुढील आर्थिक वर्षापासून प्रत्येकी र.रु.५ लाख ची तरतूद सूचविण्यात आलेली आहे.

**सन २०१८–१९ या आर्थिक वर्षातील जमेचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.**

*(आकडे रुपये कोटीत)*

| **जमा बाजू** | | |
|---|---|---|
| **अर्थशिर्षक** | **२०१८–१९ साठीचे जमेचे उद्दीष्ट** | **माहे डिसेंबर २०१८ अखेर प्रत्यक्ष जमा** |
| सुरवातीचीशिल्लक | ०.०२ | |
| स्थानिक संस्था कर | –२.९५ | ७३.४३ |
| वस्तु आणि सेवा कर (GST) | २००७.०० | ११७९.५४ |
| मिळकतकर | १६१९.९१ | ७५०.४१ |
| पाणीपट्टी | ३७९.९० | १९७.४३ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ८१५.०० | ५५९.८७ |
| इतर जमा | ७०५.०१ | १९४.४७ |
| अमृत व स्मार्ट सिटी अभियान अनुदान | ८४.५३ | ०.३० |
| शासकीय अनुदान | २१४.६० | ९९.०२ |
| प्रधानमंत्री आवास योजना | ४६.९८ | ०.०३ |
| **एकूण रक्कम रुपये** | **५८७०.००** | **३०५४.५०** |

## *(ब) दृष्टीक्षेपात सन २०१९–२० आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज–*

**सन २०१९–२० या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येतआहे.**

*(आकडे रूपये कोटीत)*

| **जमा बाजू** | | **खर्च बाजू** | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | १६६५.०० |
| स्थानिक संस्था कर | १९९.१५ | वीज खर्च व दुरूस्ती | २५५.०१ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | १८०१.०० | पाणी खर्च | १७०.०० |
| मिळकतकर | १७२१.८७ | कर्ज परतफेड, व्याज व घसारा | ९१.६१ |
| विकास शुल्क | ७९९.६६ | औषधे, पेट्रोल/डिझेल | ११०.४२ |
| पाणीपट्टी | ४५७.३५ | देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | ११२६.१५ |
| शासकीय अनुदान | २५३.४५ | वॉर्डस्तरीय | ३४.४० |
| इतर जमा | ६०२.५० | क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे | ८२.४० |
| कर्ज/रोखे | २००.०० | (नॉन प्लॅन) | |
| प्रधानमंत्री आवास योजना | ५०.०० | भांडवली व विकासाची कामे | २३८१.११ |
| | | अमृत व स्मार्ट सिटी | १६८.८८ |
| | | अभियानवर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| **एकूण** | **६०८५.००** | **एकूण** | **६०८५.००** |

अंदाजपत्रक हे शहराच्या विकासाची दिशा दर्शविणारा आरसा असून, त्याच्या बांधिलकेची जबाबदारी प्रशासनावर असते. अंदाजपत्रकाच्या काटेकोर अंमलबजावणीवर लोकांचे जीवनमान, शहराचा सर्वांगीण विकास, नागरिकांच्या गरजांची पूर्तता अशा अनेक स्वरुपाच्या बाबी अवलंबून असतात. त्याचे अंतिमत: उत्तरदायित्व हे संपूर्णपणे प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर आधारलेले असल्याने त्याची जबाबदारी पेलविण्याची क्षमता व ऊर्जा प्रशासनात निर्माण करणे हे मी प्रशासनाचा प्रमुख असल्याने सर्वस्वी माझ्यावर आहे. हेच ध्येय समोर ठेऊन शहराचा विकास आरंभा पासून अंतिम टोकापर्यंत नेण्याचा मनोदय व्यक्त करुन अंदाजपत्रक सादर करताना मा. महापौर, मा. उपमहापौर, मा.अध्यक्ष स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.सर्व पक्षनेते, मा. सर्व पदाधिकारी, मा. प्रभाग समिती अध्यक्ष, मा. वृक्ष संवर्धन समिती सदस्य, मा. सर्व सभासद, अधिकारी व कर्मचारी वर्ग, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था व सर्व प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले, त्याबद्दल मी सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे!

सर्व संबंधित मा. केंद्रातील व राज्यातील माननीय मंत्रीमहोदय, मा. संसद सदस्य, मा.विधी मंडळ सदस्य, मा. खासदार महोदय, सर्व विधानसभा सदस्य, सर्व विधानपरिषद सदस्य तसेच केंद्र व राज्य शासनाचे मार्गदर्शक यांचेही बहुमूल्य सहकार्य असून, त्या सर्वांची मी कृतज्ञता व्यक्त करतो!हे अंदाजपत्रक तयार करताना ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सहकार्य केले आहे, त्या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे !

अंदाजपत्रकाची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करताना सर्वांचे सहकार्य मिळेल या विश्वासासह मी आज दिनांक १७.०१.२०१९ रोजी पुणे महानगरपालिकेतील माझे अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

**(सौरभ राव)**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

दिनांक :१७/०१/२०१९